रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १८२
www.ramprahar.com

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पनवेल महापालिकेची प्लास्टिकविरोधी कारवाई/३
रस्त्यावर थुंकणाऱ्या तरुणावर दंडात्मक कारवाई/५
विजय हजारे ट्रॉफीसाठी उद्या फायनल/८

## कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाला केंद्राकडून मंजुरी



**नवी दिल्ली :** सरकारी कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने गुरुवारी (दि.१६) घेतला. या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली आहे. त्याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, हा आयोग २०२६पर्यंत स्थापन केला जाईल. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी यापूर्वीच लागू केल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. अर्थसंकल्पापूर्वी मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना चांगली बातमी दिली आहे. आठव्या वेतन आयोगाला मंजुरी देऊन सर्व कर्मचाऱ्यांना खूश केले आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवर गेला आहे. त्यावेळी मोदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारक अनेक महिन्यांपासून आठव्या वेतन आयोगाच्या प्रतिक्षेत होते. ही प्रतिक्षा संपली आहे.

# भारताच्या स्टार्टअप्स क्रांतीत महाराष्ट्र अग्रेसर -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या स्टार्टअप्स क्रांतीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. काळाची गरज ओळखून स्टार्टअप्स धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला असून हे देशातील आधुनिक धोरण ठरणार आहे. या माध्यमातून राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच सिडबी (स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया)कडून स्टार्टअप्ससाठी दोनशे कोटी रुपयांची तर प्रत्येक प्रादेशिक विभागासाठी तीस कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



बांद्रा-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्या वतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप्स दिवस' कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि.१६) करण्यात आले होते. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दीप प्रज्वलन झाले.

कार्यक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रदीपकुमार डांगे, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी, मेरीको लिमिटेडचे अध्यक्ष हर्ष मारीवाला, अपग्रेड अँड स्वदेस फाऊंडेशनचे सहसंस्थापक रॉनी स्क्रूवाला, नायकाच्या संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फाल्गुनी नायर यासह, स्ट्राइड व्हेंचर्स आणि स्ट्राइडवनचे संस्थापक इशप्रीत सिंग गांधी, आयआयटीचे माजी विद्यार्थी कल्याण चक्रवर्ती, गो इंडियाच्या व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता, महाराष्ट्रासह देशभरातील तंत्रज्ञान, कृषी, सेवा क्षेत्र, औषधनिर्माण तसेच पर्यटन अशा विविध क्षेत्रांतील एक हजार स्टार्टअप्स या कार्यक्रमात उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवे उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप्स सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्टअप्स होते, आज देशात एक लाख ५७ हजार स्टार्टअप्स झाले आहेत. राष्ट्रीय स्टार्टअप्स दिनानिमित्त अभिमानाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप्स क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६ हजार स्टार्टअप्स आहेत. देशात सर्वात जास्त महिला संचालक असलेले महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे.

'ए आय' स्टार्टअप्सचे सक्षमीकरण करून उत्कृष्टतेचे केंद्र बनतील. एआय हे तंत्रज्ञानातील भविष्य असून स्टार्टअप्ससाठी मोठे योगदान देणारे ठरणार आहे. यामुळे केवळ उद्योगाच्या संधी नाही तर रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. राज्याला स्टार्टअप्समध्ये आघाडीवर आणण्यासाठी राज्य शासनासोबत काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित उद्योजकांना केले.

### महाराष्ट्र स्टार्टअप्सची राजधानी : ना. लोढा

कौशल्य विकास मंत्री लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात कौशल्य विकास विभाग सुरू करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी राज्यात कौशल्य विकास विभागाला गती दिली. राज्यातील स्टार्टअप्सला जगात पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस प्रयत्नशील आहेत. जगात देशाला नंबर एक बनविण्यासाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहेत. सर्व स्टार्टअप्स देशाला पुढे नेण्यासाठी नक्कीच प्रयत्न करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.



### शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना जासई येथे अभिवादन

# लोकनेते 'दिबा' देशाचे नेते -ना. गणेश नाईक

### नवी मुंबई विमानतळावर 'दिबां'चे विशेष फलक लावूया

**उरण : प्रतिनिधी**

लोकनेते दि. बा. पाटील हे केवळ प्रकल्पग्रस्तांचे नव्हे तर देशाचे नेते होते, त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर लोकनेते दि. बा. पाटील यांचे विशेष फलक लावण्याची इच्छा राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली. ते उरण तालुक्यातील जासई येथे हुतात्म्यांच्या अभिवादनावेळी बोलत होते.

महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान जासईच्या वतीने १९८४मधील गौरवशाली व शौर्यशाली शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांचा ४१वा स्मृतीदिन गुरुवारी (दि.१६) हुतात्मा मैदान जासई येथे आयोजित करण्यात आला होता. सरकार आणि सिडकोविरोधात उरणमध्ये शेतकरी आंदोलन उभारण्यात आले होते. या आंदोलनातील पाच शेतकरी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी जासई येथील हुतात्मा स्मारकात हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली.





स्मारकाच्या प्रांगणातील हुतात्म्यांना तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व दि. बा. पाटील यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे हुतात्मा दिनानिमित्त चिर्ले येथे नामदेव शंकर घरत, तर धुतूम येथे रघुनाथ अर्जुन ठाकूर यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पनवेलच्या महात्मा ज्योतिबा फुले आर्टस, सायन्स आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी हुतात्म्यांना मानवंदना दिली.

या वेळी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, दि. बा. पाटील हे केवळ प्रकल्पग्रस्तांचे नव्हे तर देशाचे नेते होते. (पान २ वर..)

## निवडक

### विजापूरच्या जंगलात १२ नक्षलवाद्यांचा खात्मा

**विजापूर :** काही दिवसांपूर्वी छत्तीसगडच्या विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या स्फोटात आठ जवानांना वीरमरण आले होते. सुरक्षा दलांनी या घटनेचा बदला घेतला आहे. गुरुवारी (दि.१६)सकाळपासून विजापूरच्या जंगलात नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या गोळीबारात १२ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले असून, आकडा वाढण्याची शक्यता आहे. लपून बसलेल्या नक्षलवाद्यांचा शोध सुरू आहे.

### दिल्ली विधानसभा निवडणूक; भाजपची चौथी यादी जाहीर

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने नऊ उमेदवारांसह चौथी यादी जाहीर केली. ७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी भाजपने आतापर्यंत ६८ उमेदवार जाहीर केले आहेत. चौथ्या यादीत ग्रेटर कैलासमधून आप उमेदवार आणि दिल्ली सरकारमधील मंत्री सौरभ भारद्वाज यांच्या विरोधात भाजपने शिखा राय यांना उमेदवारी दिली आहे. तर दिल्ली आपचे प्रदेशाध्यक्ष आणि बाबरपूरचे उमेदवार गोपाल राय यांच्याविरोधात अनिल वशिष्ठ यांना उमेदवारी दिली आहे.

## सैफ अली खानवर चाकूहल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेता सैफ अली खान याच्यावर मुंबईतील राहत्या घरात चाकूहल्ला करण्यात आला. ही घटना गुरुवारी (दि.१६) मध्यरात्री घडली.





या हल्ल्यानंतर सैफ जखमी झाला असून त्याच्यावर मुंबईतील लीलावती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सैफ अली खान यांच्यावर हल्ला झाला आहे. याप्रकरणी कारवाई सुरू आहे. पोलिसांनी तुम्हाला याबाबत सगळी माहिती दिली आहे. कोणत्या मोटोने त्यांच्या घरात आरोपी घुसले होते? हे तुम्हाला कळले असेल पोलीस वेळोवेळी माहिती देत आहेत.

देशातील मेगा सिटींमधील सर्वांत सुरक्षित शहर मुंबई आहे. हे खरं आहे की, कधी कधी घटना घडतात. त्याला गांभीर्याने घेतले पाहिजे, मात्र त्यामुळे मुंबई असुरक्षित आहे, असे म्हटले जाणे चुकीचे आहे. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आमचा पूर्ण प्रयत्न असतो आणि भविष्यात अधिक कायदा सुव्यवस्था कडक व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पोलिसांनी नोंदवलेल्या जबाबानुसार, सैफ अली खानच्या घरातील मदतनीस महिलेला हल्लेखोराने धारदार शस्त्राने धमकावत गप्प राहायला सांगितल व एक कोटी रुपये मागितले. हा गोंधळ ऐकून सैफ अली खान आपल्या खोलीतून खाली आला. त्यानंतर सैफ व दरोडेखोरात झटापट झाली. हल्लेखोराने चाकूचे टोक सैफच्या मणक्यात घुसवले. सैफला गंभीर दुखापत झाली होती आणि त्यावेळी ड्रायव्हर उपलब्ध नव्हता, त्यामुळे मुलगा इब्राहिम अली खान व सारा अली खान यांनी सैफला रिक्षातून लीलावती हॉस्पिटलमध्ये नेले. त्यानंतर डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार सुरू केले.

### 'लाडक्या बहिणीं'ना २६ जानेवारीपूर्वी हफ्ता

**मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत असून जानेवारी महिन्याचा हफ्ता मिळण्याची तारीख समोर आली आहे. लाडक्या बहिणींना २६ जानेवारीच्या आधीच या महिन्याचा हफ्ता मिळणार असल्याचे राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केले आहे.




या संबंधी माहिती देताना आदिती तटकरे म्हणाल्या की, २६ जानेवारीच्या आधी जानेवारी महिन्याचा लाभ मिळेल असा प्रयत्न सुरू आहे. यासाठी ३,६९० कोटींचा निधी आम्हाला मिळणार आहे. अर्थसंकल्पाच्यावेळीही महिलांना लाभ कसा मिळेल याची तरतूद आम्ही करणार आहोत.

आदिती तटकरे म्हणाल्या की, आम्ही फेब्रुवारीचे नियोजन सुद्धा करत आहोत. लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्ही दोन कोटी ४६ लाख महिलांना दिला. काही महिलांबाबत तक्रार आली होती. ड्युप्लिक्शन झालेल्या केसेस कमी होत्या. त्यामुळे फार काही फरक पडेल, असे मला वाटत नाही. थोड्याफार कमी होतील.

## पुण्याजवळ भरधाव कंटेनरने १० ते १५ जणांना उडवले

### एकाचा मृत्यू तर मुलीचा पाय कापला

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहरातील चाकण शिक्रापूर रोडवर गुरुवारी (दि.१६) अपघाताचा मोठा थरार घडला आहे. एका सुसाट कंटेनरने अनेक वाहनांना धडक दिली आहे. या घटनेत १० ते १५ जणांना कंटेनरने उडवले आहे. त्यामध्ये एक जणाचा मृत्यू झाला आहे तसेच अनेक जण जखमी आहेत. अपघातानंतर जमाव संतप्त झाला. त्यांनी कंटेनरवर चढून चालकाला बेदम मारहाण केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.





चाकण, रासे, शेलगाव, पिंपळगाव आणि चौफुला परिसरात एकाच मालवाहतूक कंटेनर चालकाने हा प्रताप केला. चालकाला शिक्रापूर हद्दीत नागरिकांनी अडवून चांगलाच चोप दिला. शिक्रापूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलेले आहे.

शेलपिंपळगाव येथे या गाडीने एक मोठा ट्रक व कारला उडवले. यात दुसऱ्या ट्रक खाली कार घुसली. या कंटेनरने चाकण येथे एका मुलीला धडक दिली. त्यात तिचा पाय शरीरापासून वेगळा झाला. सुमारे १० ते १५ जणांना कंटेनरने उडवले आहे. त्यामध्ये एक जणांचा मृत्यू झाला आहे. अनेक जण जखमी आहेत. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले आहे.

## 'इस्रो'कडून अंतराळात डॉकिंग प्रणालीची मोहीम फत्ते; दोन अंतराळयान भारताने जोडले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताने अवकाशात नवीन किर्तीमान स्थापित केला आहे. इस्रोला स्पेडेक्स मिशनच्या डॉकिंगमध्ये ऐतिहासिक यश मिळाले आहे. इस्रोने पहिल्यांदा पृथ्वीच्या कक्षेत दोन उपग्रह यशस्वीरित्या स्थापित केले आहेत. अमेरिका, रशिया, चीननंतर अशी कामगिरी करणारा भारत हा चौथा देश ठरला आहे. खरच भारतासाठी हा अभिमानाचा क्षण आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या यशासाठी इस्रोला शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान मोदी यांनी उपग्रहांच्या अवकाशातील डॉकिंगच्या यशासाठी इस्रोचे वैज्ञानिक आणि सगळ्या अंतरिक्ष समुदायाला शुभेच्छा दिल्या. भविष्यातील भारताच्या महत्वकांक्षी अवकाश मोहिमांसाठी हे एक महत्त्वाच पाऊल आहे. १२ जानेवारीला या मिशनची ट्रायल चाचणी पूर्ण झाली होती.

इस्रोने या ऐतिहासिक यशसासाठी सगळ्या टीमला शुभेच्छा दिल्या आहेत. स्पेडेक्स मिशनची डॉकिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्याच इस्रोकडून सांगण्यात आले. हा एक ऐतिहासिक क्षण आहे. १५ मीटर ते ३ मीटर होल्ड पॉइंट पर्यंत आणण्याची प्रोसेस पूर्ण झाली. स्पेसक्राफ्टला यशस्वीरित्या कॅप्चर करण्यात आले. अवकाशात यशस्वी डॉकिंग करणारा भारत जगातील चौथा देश ठरला आहे. डॉकिंग म्हणजे अवकाशात कक्षेत दोन उपग्रहांना एकमेकांच्या जवळ आणणे, त्यांना जोडणे.

रविवारी १२ जानेवारीला स्पेडेक्स मिशनमधील दोन उपग्रह चेसर आणि टार्गेट परस्परांच्या खूप जवळ आले होते. दोन्ही सॅटलाइटना आधी १५ मीटर आणि नंतर ३ मीटरपर्यंत जवळ आणण्यात आले होते. याच्या एकदिवस आधी शनिवारी स्पेस डॉकिंग एक्सपेरीमेंट (स्पेडेक्स) मिशनमधील दोन उपग्रहांमधील अंतर २३० मीटर होते. या आधी दोन ते तीनवेळा हा प्रयोग स्थगित करण्यात आला होता.

**भविष्यात असा फायदा**

या उपग्रहांचे वजन २२० किलो होते. चंद्रयान-४ मिशनमध्ये याच डॉकिंग-अनडॉकिंग टेक्नोलॉजीचा वापर होणार आहे. नासाप्रमाणे स्वत:च स्पेस स्टेशन बनवण्यात या मिशनमधील टेक्नोलॉजी वापरली जाणार आहे. माणसाला चंद्रावर पाठवण्यासाठी सुद्धा या टेक्नोलॉजीची गरज भासणार आहे.

### पाकला हरवून भारतीय दिव्यांग क्रिकेट संघ विजयी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने टी २० चॅम्पियन्स ट्रॉफीत विजयी चौकार लगावला आहे. टीम इंडियाने विक्रांत केणी याच्या नेतृत्वात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पाच विकेट्सने धुव्वा उडवला आहे. टीम इंडियाने या विजयासह चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये धडक दिली आहे.

पाकिस्तानने टीम इंडियाला विजयासाठी १३९ धावांचे आव्हान दिले होते. टीम इंडियाने हे आव्हान ५ विकेट्सच्या मोबदल्यात १२ चेंडूआधी पूर्ण केले. टीम इंडियाने १८ षटकांमध्ये १४१ धावा केल्या. टीम इंडियाचा हा या स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धचा दुसरा विजय ठरला. राजेश कन्नूर हा टीम इंडियाच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील निभिष चौधुरींचे कौतुक

### सिटी चॅम्पियनशिपमध्ये पटकाविली दोन रौप्यपदके



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील कराटे आणि स्केटिंगचा विद्यार्थी निभिष दे चौधुरी याने घणसोली येथे झालेल्या रोलर अथलेटिक्स नवी मुंबई सिटी चॅम्पियनशिपमध्ये लांब आणि छोट्या शर्यतीमध्ये दोन रौप्यपदके पटकावली आहेत. रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी निभिषचे कौतुक केले.

# आविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेत्यांचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून अभिनंदन

**मुंबई, माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे १२ ते १५ जानेवारी, २०२५ दरम्यान पार पडलेल्या १७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या संशोधन महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने उत्तम कामगिरी करून १३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ३ कांस्य पदकासह सलग सहाव्या वर्षी विजेतेपद मिळवून अव्वल स्थान मिळाल्याबद्दल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विजेत्यांचे आणि मुंबई विद्यापीठाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



आविष्कार २०२५ ही संशोधनपर स्पर्धा दिनांक १२ ते १५ जानेवारी पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, लोणेरे ता. माणगाव जि. रायगड येथे आयोजित करण्यात आली होती. या समारंभाला प्रा. डॉ. सुनिल भागवत, संचालक, भारतीय विज्ञान, शिक्षण आणि संशोधन संस्था, पुणे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती तसेच यावेळी कर्नल प्रा. हेमलता बागला कुलगुरू, एच.एस.एन.सी. विद्यापीठ, मुंबई याही उपस्थित होत्या. ही स्पर्धा राज्यपाल कार्यालयातून संचालित होते. याप्रसंगी राजभवनातर्फे डॉ. गावंडे व इतर मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेमध्ये एकूण ७७७ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सहा श्रेणींमध्ये ही स्पर्धा दरवर्षी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठात आयोजित होते. यावर्षी ही स्पर्धा भरवण्याचा बहुमान लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाला मिळाला होता.

मुंबई विद्यापीठाला प्रथम क्रमांक मिळाला त्याबद्दल मंत्री पाटील म्हणाले की, मुंबई विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी संशोधन, नाविन्यता आणि कल्पकतेच्या जोरावर आविष्कार सारख्या संशोधन स्पर्धेतील यशाने मुंबई विद्यापीठाला एक वेगळी उंची मिळवून दिली आहे. या संशोधनाद्वारे समाजजीवन सुसह्य व आनंददायी होण्यासही मदत होईल.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, डॉ. सुनिल पाटील, डॉ. मनीष देशमुख ,डॉ. वैशाली निरमळकर, प्रा. डॉ. शशिकुमार मेनन, प्रा. डॉ. सुनीता शैलजन, डॉ. मिनाक्षी गुरव, डॉ. भूषण लांगी, डॉ. रूपा राव मुंबई विद्यापीठाचे अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

राजभवन येथे आयोजित या संशोधन महोत्सवामध्ये राज्यातील सर्व २४ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक विद्यापीठतून या स्पर्धेसाठी मानव्यविद्या, भाषा आणि कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि विधी, मुलभूत शास्त्रे, शेती व पशू संवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान आणि वैद्यक शास्त्र व औषधशास्त्र या प्रवर्गातून ४८ संशोधन प्रकल्प पाठविले जातात. मुंबई विद्यापीठाने या स्पर्धेसाठी ४८ संशोधन प्रकल्प सादर केले होते. मुंबई विद्यापीठाच्या ४८ पैकी २३ संशोधन प्रकल्पांना पारितोषिके मिळाली आहेत.

या स्पर्धेत प्रथम बंडाबे, झनेटा रेमंड, राधिका भार्गव, श्रेयांस कांबळे, चैताली बने, कृष्णकांत लसुने, फरहीन शेख, विवेक शुक्ला, अंकित गोहिल, श्रावणी वाडेकर, तनिशा कौर, प्रतिक मेहेर, आणि वैष्णवी परब यांनी सुवर्ण पदक पटकाविले. रौप्य पदक अथर्व लखाने, चैत्रा देशपांडे, मंगलम लुनकर, ऋतुजा शिंदे, विरा जैन, आभाश शर्मा आणि मानसी झा यांना प्रदान करण्यात आले. समृद्धी मोटे, तेजश्री जायभाये आणि श्रेया गर्गे यांना कांस्य पदक मिळाले.

# अमृतांजन ब्रिजखाली कंटेनर आडवा

## चालकासह दोन कामगार जखमी

**खोपोली, खालापुर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर अमृताजन ब्रिज खाली कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने, वळणावर कंटेनर पलटी होऊन भीषण अपघात झाला, या अपघातात कंटेनर मधील चालक आणि दोन कामगार जखमी झाले आहेत,



मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर अपघाताची मालिका सतत चालू असून गुरुवारी दुपारी कंटेनर चालक मोहम्मद कैफ (वय २२ रा सुलतानपूर उत्तर प्रदेश) हा चेन्नई वरून माल घेऊन मुंब्रा येथे जात असताना तो एक्सप्रेसवेवरील बोरघाटात अमृताजन ब्रिज खालील उतारावरील वळणावर आला असता चालकाचे कंटेनरवरील नियंत्रण सुटल्याने तो पलटी झाला.

यामध्ये चालक आणि दोन कामगार जखमी झाले आहेत, त्यांना तत्काळ कंटेनर मधील जखमीना बाहेर काढून आयआरबीच्या रुग्णवाहीकेमध्ये जागीच उपचार केले, तर अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या सहाय्याने बाजूला घेऊन एक्सप्रेसवे वाहतूकीसाठी चालू करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, आयआरबी टीम तत्काळ घटनास्थळी दाखल झाली.

# सिडको कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकरिता आमदार मंदा म्हात्रे यांची सिडकोत बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी , बातमीदार**

सिडको महामंडळातील सुमारे ३०० कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याकरिता सिडको भवन समोर मुंबई लेबर युनियनने एक दिवसीय धरणे आंदोलन पुकारले होते. या आंदोलनास स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी जाहीर पाठिंबा दिला.



यावेळी सिडको कर्मचाऱ्यांच्या सबंधित मागण्या आमदार मंदा म्हात्रे यांनी जाणून घेत सहव्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डीले यांच्या दालनात बैठक घेतली. सदर कर्मचाऱ्यांचा मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात याव्यात असे आदेश आमदार मंदा म्हात्रे यांनी सहव्यवस्थापकीय संचालक कर्डीले व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीत राहुल कर्डीले यांनी सदर मागण्यांवर सकारात्मकता दाखवत सदरच्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले.यावेळी मुंबई लेबर युनियनचे उपाध्यक्ष आणि कायदेशीर सल्लागार ॲड्. सुरेश ठाकूर, सहा. चिटणीस सुजित पाटील आणि शिष्टमंडळ सिडको अधिकारी प्रमदा भिडवे, राजपूत, प्राजक्ता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# कर्जतमधील गुलमोहर विश्रांतीगृहाचे उद्‌घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मधील नूतनीकरण करण्यात आलेल्या गुलमोहर विश्रांती गृहाचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदारांनी विश्रांती गृहाच्या नवीन बांधण्यात येत असलेल्या इमारतीची पाहणीही करण्यात केली.



मुद्रे ( खुर्द ) गावानजीक असलेल्या गुलमोहर विश्रांतीगृहाचे नूतनीकरणाचे काम गेली पाच - सहा वर्षे सुरू होते. ते काम पूर्ण झाल्यानंतर आज या विश्रांतीगृहाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी सभापती अमर मिसाळ, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे, शाखा अभियंता अक्षय चौधरी, उप जिल्हाप्रमुख भाई गायकर, संभाजी जगताप, तालुकाप्रमुख सुदाम पवाळी, पंकज पाटील, शिवराम बदे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश जाधव, माजी नगरसेवक संकेत भासे, कृष्णा घाडगे, प्रसाद थोरवे, अभिषेक सुर्वे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार थोरवे यांनी, मागील कारकीर्दीत सुरू केलेली काही विकास कामे पूर्ण झाली आहेत. त्यांचे लोकार्पण करण्यात येत आहे. तर कामे लवकरात लवकर व्हावीत यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे स्पष्ट केले. त्यानंतर सुमारे तीन कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या इमारतीची पाहणी आमदार थोरवे यांनी केली. याप्रसंगी सुरेश चंचे, उदय शिंदे, रविंद्र पाटील, भूषण भोईर, सोहनी, सुनील भालिवडे, प्रदीप वायकर, शरद बडेकर, प्रमोद खडे, प्रवीण थोरवे, किशोर कदम, अशोक मोरे, अनंत नीलधे, नदीम खान, उमेश म्हसे, राकेश दळवी, योगेश थोरवे आदी उपस्थित होते.

# विधी सेवा शिबिर व शासकीय सेवा योजनांसाठी कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग व जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बालगंधर्व रंगभवन, रिलायन्स पेट्रोकेमिकल टाउनशिप, नागोठणे, ता. रोहा येथे विधी सेवा शिबिर व शासकीय सेवा योजनांचा महामेळावा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीरामध्ये रायगड जिल्हयातील शासकीय कार्यालयाच्या योजनांची माहिती एकाच छताखाली सर्व लाभार्थ्यांना मिळणार आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सचिव, अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.या कार्यकमाचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग ए.एस.राजंदेकर यांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील गड किल्ले फोटोग्राफी स्पर्धेत कल्पेश पाटील प्रथम

**महाड : प्रतिनिधी**

प्रतिवर्षी श्री संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन केले जाते. या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून श्री शंभुछत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती, राजधानी रायगड यांनी 'महाराष्ट्रातील गडकिल्ले' या विषयवार फोटोग्राफी स्पर्धेच आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये महाडच्या कल्पेश गणेश पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.



किल्ले रायगडावर श्री शंभू छत्रपती यांचा राज्याभिषेक सोहळा आयोजित केला होता. श्री शंभू छत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. यावर्षी समितीने गड किल्ले या विषयावर फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन केले होते. महाराष्ट्रातील अनेक तरुण आणि नामवंत फोटोग्राफरने सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून महाडच्या कल्पेश गणेश पाटील या तरुण फोटोग्राफरने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

संपूर्ण महाराष्ट्रातून शेकडो फोटोग्राफर्सनी स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला. द्वितीय क्रमांक :- जय मावळे, तृतीय क्रमांक :- चिराग भंगाळे, उत्तेजनार्थ :- चेतन पालीवाल , उत्तेजनार्थ :- निखील महामिने यांना देण्यात आला. प्रथम क्रमांक स्पर्धकांस रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले. स्पर्धेच परिक्षण राष्ट्रीय अवॉर्ड विनर फोटोग्राफर श्रीकांत शिंपी यांनी केले .

पान १ वरुन

## लोकनेते 'दिबा' देशाचे नेते -ना. गणेश नाईक

कष्टकरी वर्गाच्या हितासाठी लढण्याचा त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न करून पक्षीय मतभेद असतांनाही सर्वांना एकत्र करून लढे दिले. समाजाची जात पात न मानता सेवा केली पाहिजे. तर फेब्रुवारी महिन्यात नवी मुंबईतील शेतकऱ्यांच्या व प्रश्नांवर मुख्यमंत्र्या सोबत बैठक घेतली जाईल. त्याचप्रमाणे एप्रिलमध्ये नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव लागणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तर नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची जानेवारी २०२५ पर्यंतची घरे कायम करा अशी भूमिका या वेळी त्यांनी मांडली. नवी मुंबई विमानतळावर 'दिबां'चे विशेष फलक लावण्याची इच्छाही राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्यांनी भूमिपुत्रांचे प्रश्न वेळीच सुटणे गरजेचे असल्याचे मत मांडले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार बाळाराम पाटील, मनोहर भोईर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, कामगार नेते जितेंद्र घरत, सुरेश पाटील, भूषण पाटील, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर चौरुशीला घरत, लोकनेते दि.बा.पाटील यांचे सुपूत्र अतुल पाटील, अभय पाटील, भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, चंद्रकांत घरत, दिनेश पाटील, जे.डी. तांडेल, विनोद म्हात्रे, माजी नगरसेवक हरेश केणी, विकास घरत, तेजस कांडपीळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, भावना घाणेकर, शिवसेनेचे रामदास शेवाळे आदी उपस्थित होते. या वेळी केंद्रीय नागरी विमान उड्डाणमंत्री मुरलीधर मोहळ यांचा संदेश वाचून दाखविण्यात आला.

नवी मुंबई वसविण्यासाठी सिडकोने कवडीमोल भावाने जमिनी संपादित करण्यासाठी सुरुवात केली होती. शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळावा यासाठी प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जानेवारी १९८४मध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. दास्तान व नवघर येथे हजारोंच्या संख्येने जमलेल्या शेतकरी आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. या गोळीबारात नामदेव शंकर घरत (चिर्ले), रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतुम), कमलाकर कृष्णा तांडेल तसेच महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील (पागोटे) यांनी बलिदान दिले. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी हौतात्म्य पत्करलेल्या पाचही हुतात्म्यांना अभिवादन आणि त्यांचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी १६ जानेवारी रोजी जासई‌त, तर १७ जानेवारी रोजी पागोटे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

# मुंबई-गोवा महामार्गावर जनजागृती

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी आणि वाहन चालकांना सुरक्षा विषयक मार्गदर्शन करण्यात आले. या वाहन चालकांना नियमांची माहिती मिळावी आणि होणाऱ्या अपघातांना आळा बसावा यासाठी महामार्ग वाहतूक पोलिसांकडून रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. हे अभियान १ ते ३१ जानेवारी असा एक महिना सुरू राहणार आहे.



महामार्गावरून वाहन चालवताना चालक बेदरकार पणे आणि बेशिस्त वाहने चालवतात, वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अपघात होतात. हे अपघात टाळण्यासाठी वाहनचालकांना जनजागृती करणे आवश्यक असते.

या निमित्ताने महामार्ग वाहतूक पोलीस शाखा महाड यांनी महामार्गावरून जाणाऱ्या ५०० वाहनचालकांना तसेच तालुक्यातील विद्यालय आणि महाविद्यालयातील २७० विध्यार्थी २६ शिक्षक आणि १९ बस चालकांना राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहतूकीचे नियम तसेच मोटार वाहन कायद्याबाबत प्रबोधन करण्यात आले.

टँकर अपघात नंतर अनेक वेळा आग लागते त्या वेळी त्या ठिकाणी कशाप्रकारे आगीवर नियंत्रण आणायच्या या बाबतीत देखील प्रत्येक्ष दर्शनी केवा फ्रेग्रंसेस प्राईव्हर लिमिटेड या कंपनी कडून विकास सासणे, रवींद्र चव्हाण, बिपीन माळी, विजय शेलार, अक्षय जाधव यांनी दाखवले त्या वेळी एल एन्ड टी चे सुरक्षा अधिकारी हरिहर नायर देखील हजर होते.

महामार्ग वाहतूक पोलीस उप निरीक्षक प्रवीण दडे, गणेश भिलारे, पोलीस हवालदार नंदन निजामपूरकर, विश्वास पाटील, हवालदार मोरे, शिपाई दीपक बल्लाळ, अमोल झेपले यांनी भाग घेतला.

# रिक्त पदांकरिता इच्छुक माजी सैनिकांनी अर्ज सादर करावेत

**रायगड :** माजी सैनिक/विधवा/युद्ध विधवा यांच्याकरिता कर्मचारी वर्ग-मेस्को पर्यवेक्षक, वाहन चालक, लिपिक, शिक्षण आणि शारीरीक प्रशिक्षण प्रशिक्षक, स्टोअर किपर सह कँटिन आणी वसतिगृह पर्यवेक्षक, कार्यालयीन परीचर, अधिकारी वर्ग- प्रकल्प व्यवस्थापक, क्षेत्रिय व्यवस्थापक, व्यवस्थापक, व्यवस्थापक लेखमाजी अशा एकूण-२७ रिक्त पदांसाठी वर्गवारी नुसार भरती करावयाची असून जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिकांनी रिक्त पदांकरीता अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.

याकरिता सैनिक उमेदवाराचे शिक्षण इयत्ता दहावी पास अथवा सैन्यदलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे. माजी सैनिक २१ ऑक्टोंबर २०१९ नंतर सेवानिवृत्त झालेले असावेत. माजी सैनिक उमेदवारांनी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २१ जानेवारी २०२५ अशी आहे.

# गणराज घरत भाजप प्रदेश युवक सचिवपदी

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी गणराज घरत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गणराज घरत हे नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांचे सुपुत्र आहेत. गणराज घरत हे सामाजिक कार्यात देखील अग्रेसर असून, भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून स्वच्छता मोहीमांच्या परिणामांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर स्वच्छतेप्रमाणेच शहरातील पर्यावरणाकडेही विशेष लक्ष देत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार १३ डिसेंबरपासून शहरातील महामार्ग तसेच अंतर्गत मुख्य रस्ते यांच्या सखोल स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. यामध्ये रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती, रेती, गवत, घनकचरा उचलून घेणे तसेच रस्त्यांच्या कडेला असलेली झुडपे व सुकलेले गवत काढून टाकणे त्याचप्रमाणे प्रक्रियाकृत पाण्याने रस्ते, पदपथ धुणे व हवेमध्ये स्प्रेईंग मशीनव्दारे हे पाणी मारून हवेतील धूळ कमी करण्यावर भर देण्यात येत आहे. याचा उपयोग शहराच्या हवा गुणवत्ता सुधारणेत झाल्याचे अभिप्राय नागरिकांकडून प्राप्त होत आहेत.



सायन पनवेल महामार्ग तसेच एमआयडीसी क्षेत्रातील मुख्य रस्ते यांचे अधिकार जरी नवी मुंबई महानगरपालिकेकडे नसले तरी तेथील अस्वच्छतेमुळे शहराकडे बघण्याचा त्या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा दृष्टीकोन बदलतो हे लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी शीळफाट्याकडून महापे नवी मुंबईकडे येणाऱ्या मुख्य मार्गाची शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि संबंधित अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करीत मौलिक सूचना दिल्या. त्याठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असलेली माती, काही ठिकाणी डेब्रीजचे ढीग, सुकलेली अस्ताव्यस्त झाडेझुडपे यांची सखोल साफसफाई करण्याचे निर्देश दिले.

शीळ एमबीआरपासून महापालिकेची हद्द सुरू होत असून तेथून दोन्ही बाजूने रस्त्याची व दुभाजकाची स्वच्छता करून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शीळ एमबीआरचा परिसरही छोटी शोभिवंत झाडे लावून सुशोभित करावा असे आयुक्तांनी सूचित केले. तेथून महानगरपालिकेच्या हद्दीतील झोपडपट्टी भागाला तसेच जुन्या पाड्यांना पाणीपुरवठा होत असून तो वाढविण्याची गरज लक्षात घेत तशा प्रकारची मागणी शासन स्तरावर करण्यासाठी प्रस्ताव करण्याचेही त्यांनी सूचित केले. महानगरपालिकेची हद्द जिथून सुरू होते त्या सर्व दिशांवरील रस्त्यांवर शहराच्या नावलौकिकाला साजेशा आकर्षक कमानी उभारण्याचेही निर्देश त्यांनी या वेळी दिले.

अडवली, भूतावली गाव व परिसराची पाहणी करीत त्याठिकाणी स्वच्छता वाढीवर भर देण्याचे आयुक्तांनी सूचित केले. त्याचप्रमाणे तेथील नागरी आरोग्य केंद्र तसेच शाळा इमारत आणि परिसराची पाहणी करीत तेथील स्वच्छता व नीटनेटकेपणा यामध्ये सुधारणा कराव्यात असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

# पनवेलमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई

## महापालिकेने केला ८० हजार रुपयांचा दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पनवेल, खारघर, कळंबोली, कामोठे या चार प्रभागांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये मागील १६ दिवसात सुमारे ४७ किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे ८० हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात गुरुवारी (दि.१६) मोठी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'ब' कळंबोली प्रभागामध्ये प्लास्टिक पिशवी प्रतिबंध (सिंगल युझ प्लास्टिक) कारवाई दरम्यान रुपये १० हजार हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला, या कारवाई मध्ये सुमारे नऊ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. या वेळी मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे व कर्मचारी उपस्थित होते.

याचबरोबर मागील पंधरा दिवसांमध्ये पनवेल महापालिकेच्या प्रभाग अ, प्रभाग ब, प्रभाग क, प्रभाग ड मध्ये सातत्याने प्लास्टिक विरोधोत कारवाई केली जात असून या वेळी सुमारे ३८ किलोपेक्षा अधिक सिंगल युज प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला आहे.



पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टीकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महापालिकेच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे.

सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री आणि वापरांवर बंदी करण्यात आली आहे. प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर पाच हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये ,तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.

### दुकानाबाहेर कचऱ्याचे डबे ठेवण्याचे निर्देश

याचबरोबर चारही प्रभागांमधील दुकानदारांना दुकानाबाहेर कचऱ्याचे डबे ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशाचे पालन न करणाऱ्या दुकानादारांवरतीदेखील दंडात्मक कारवाई करण्यात येत आहेत. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात सहाय्यक आयुक्त स्मिता काळे व विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या पर्यवेक्षणाखाली चारही प्रभागांमध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई तसेच दुकानाबाहेर कचऱ्याचे डबे न ठेवणाऱ्या दुकानदारांवरती दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.





**कामोठे : येथे स्वामीनारायण मंदिराचा भूमिपूजन सोहळा बुधवारी झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून गुरुमहाराजांचे पवित्र दर्शन घेतले. भुजधाम सोसायटीतील समस्त हरिभक्तांनी यजमान म्हणून सहभाग घेत, सोहळा भक्तिभावाने सोहळा केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत माजी नगरसेवक राजू सोनी उपस्थित होते.**



**पनवेल : तक्का गावाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील नाल्यात रिक्षा गेल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली. या अपघातात रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे.**





**उरण :** चिर्ले येथे हुतात्मा नामदेव शंकर घरत स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आयोजीत आणि रायगड जिल्हा कब्बडी असोसिएशनच्या मान्यतेने भव्य कब्बडी स्पर्धा २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे तसेच चिर्ले आणि साई ब्लड बँकच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते जितेंद्र घरत, सुरेश पाटील, महेंद्र घरत, जे. डी. तांडेल आदी उपस्थित होते.





**पनवेल : वत्सला लॅन्ड डेव्हलपर्सच्या वतीने सेक्टर-२० प्लॉट नं. ८ बी या ठिकाणी वत्सला माऊलीकृपा हे गृह संकुल उभारण्यात येणार आहे. या संकुलाच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. भूमिपूजनावेळी वत्सला लॅन्ड डेव्हलपर्सचे संचालक रमेश अण्णासाहेब पाटील, विजय पटेल, भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी नगरसेवक तेजस कांपडीळे आदी उपस्थित होते.**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात परिसंवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१४) वाणिज्य विभागातर्फे महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी परिसंवादाचे आयोजन केले होते.

या परिसंवादासाठी कोटक फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना उन्नती परिसंवादाच्या माध्यमातून हॉस्पिटयालीटी, रिटेल, भविष्यात असणाऱ्या जॉबच्या संधी, तसेच विद्यार्थ्यांना एमपावर करणे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी परिसंवादाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल वाणिज्य विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विशाल देशमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे व प्रा. मनोज यादव तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१६) मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांसाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.



फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमसाठी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. श्रद्धा भोमे प्राचार्या जेके महाविद्यालय घनसोली यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना रिसर्च पेपरसाठी विषय कसे निवडायचे तसेच संशोधन पद्धती, फाइंडिंगज, हायपोथिसिस, रिसर्च पेपरचे सादरीकरण, सायटेशन व संदर्भ याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना रिसर्च पेपरसाठी विषय निवडता यावेत तसेच संशोधनातील बारकावे माहिती व्हावेत हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल मॅनेजमेंट स्टडीज विभागाचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रीत थुले यांनी केले तसेच प्रा. रेवण शिंदे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. शगुप्ता शान, प्रा. स्नेहा नाईक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन प्रा. अर्पिता यांनी केले.

## पर्ण सन्मान पुरस्कार सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वसुंधरा फाउंडेशनच्या पर्ण दिवाळी अंकाच्या वतीने देण्यात येणारा पर्ण सन्मान पुरस्कार २०२४ साहित्यिक आणि भाषा विभागाच्या उपसंचालक अंजली ढमाळ यांना ज्येष्ठ साहित्यिक आणि अतिरिक्त मुख्य निवडणूक आयुक्त किरण कुलकर्णी यांच्या हस्ते आणि जेएनपीटी महाप्रबंधक (विपणन) अंबिका सिंह, ज्येष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे, लेखिका इंदुमती जोंधळे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.



पनवेल येथे आयोजित या पर्ण सन्मान पुरस्कार सोहळ्याकरिता बालसाहित्यिकांपासून सर्व साहित्यिक आणि श्रोत्यांची मांदियाळी जमली होती. साहित्यिक व महाराष्ट्र राज्य अतिरिक्त मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. किरण कुलकर्णी यांनी वसुंधरा फाउंडेशन आयोजित केलेला काव्यपर्ण हा कार्यक्रम मराठी भाषा टिकवण्यासाठी चा एक उत्तम प्रयोग असून या कार्यक्रमात सादर झालेल्या बाल साहित्यिकांच्या कविता म्हणजे शब्दधनाची मेजवानीच असल्याचे मत व्यक्त केले.

पर्ण दिवाळी अंक २०२४च्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कथा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ डॉक्टर किरण कुलकर्णी अंबिका सिंह यांच्या हस्ते या वेळी पार पडला. सूत्रसंचालन शार्दुल बुवा यांनी केले प्रास्ताविक संपादक अपर्णा नाडगौडी यांनी केले, तर आभार कार्यकारी संपादक प्रशांत कुलकर्णी यांनी मानले. मानपत्राचे वाचन अर्चना जोशी यांनी केले. उपसंपादक कीर्ती जोशी, प्रसिद्ध कथा लेखिका सुचिता घोरपडे, श्रद्धा चमके, स्वाती गोडसे, सुधीर नाडगौडी यांच्यासह अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. अमिता म्हसकर विनिता शेटे जानवी करंदीकर नमिता बुवा अर्चना जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या ओळखपत्रांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक क्षेत्रात हिरीरीने अग्रस्थानी असणारी पत्रकारांची नोंदणीकृत संस्था म्हणजे पनवेल तालुका पत्रकार विकास मंच. संस्थेच्या प्रथेनुसार नूतन कार्यकारिणीने गुरुवारी (दि. १६) शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शन घेऊन पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद प्राप्त केले. या वेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सर्व सदस्यांना ओळखपत्रे प्रदान करण्यात आली.



ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पत्रकारांचा सहभाग असलेली पनवेल तालुका पत्रकार विकास मंच या संस्थेमध्ये बिनविरोध पदाधिकारी निवडून देण्याची प्रथा आहे. या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख उपक्रम केले जातात. आगामी वर्षभरातील वार्षिक कार्यक्रमांचे वेळापत्रक अध्यक्ष मंदार दोंदे यांनी शिर्डी अभ्यास दौऱ्यामध्ये प्रसिद्ध केले. नूतन ओळखपत्रांचे अनावरण झाल्यानंतर प्रत्येक सदस्यांना ते प्रदान करण्यात आले. विद्यमान वर्षामध्ये अध्यक्षस्थानी मंदार दोंदे, उपाध्यक्षपदी राजेंद्र पाटील, खजिनदार पदावर संजय कदम तर सरचिटणीस म्हणून हरेश साठे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

या वेळी सल्लागार विवेक मोरेश्वर पाटील, अध्यक्ष मंदार दोंदे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सदस्य दत्तात्रय कुलकर्णी, दीपक घोसाळकर, प्रवीण मोहोकर, राजू गाडे आदी उपस्थित होते.

## सीकेटी महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील सीकेटी कॉलेज अर्थात चांगु काना ठाकूर महाविद्यालयामध्ये सन २००४ च्या बॅचच्या कला शाखेमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन रविवारी (दि. १२) मोठ्या उत्साहात झाले.

कॉलेजचे माजी विद्यार्थी डॉ. रमेश यादव व सहकारी यांनी एकत्र येऊन यावेळी जुन्या आठवणी जागृत केल्या. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला शिक्षणाचा आधार असतो आणि तोच आधार योग्यवेळी मिळाला तर विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होते. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध देखील घट्ट होते आणि हेच ऋणानुबंध जपण्यासाठी स्नेहसंमेलन आयोजित करुन विद्यार्थी अपल्या जुन्या मित्रांसह शिक्षकांसोबत विचारांची देवाण घेवाण करतात. त्यामुळे जीवनात या स्नेहसंमेलनाला अनन्य साधारण महत्व असते. त्या पार्श्वभूमीवर हा आनंददायी सोहळा उत्साहात पार पडला.

या वेळी शिक्षकदेखील उपस्थित होते तसेच सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी यावेळी मार्गदर्शन केले. आपल्या हाताखालून शिकून गेलेले विद्यार्थी आज चांगल्या उच्च पदावर असल्याचा अभिमान या वेळी शिक्षकांनी व्यक्त करत सर्वांना आशीर्वाद दिले. दरम्यान विद्यार्थ्यांनी देखील शिक्षकांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमात जवळपास १०० हून अधिक माजी विद्यार्थी महाराष्ट्रच्या कानाकोपऱ्यातून आले होते.



## संपादकीय

# अनेक प्रश्न अनुत्तरित!

सुप्रसिद्ध अभिनेता सैफ अली खानवर गुरूवारी त्याच्या निवासस्थानीच एका अज्ञात हल्लेखोराने चाकूहल्ला केला. या घटनेविषयी अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित असून विरोधकांनी मात्र लागलीच कायदा व सुव्यवस्था स्थितीबद्दल राज्य सरकारला धारेवर धरणे सुरू केले आहे. देशातील महानगरांमध्ये मुंबई शहर सर्वात सुरक्षित असून एखाद्या घटनेमुळे शहराला असुरक्षित ठरवणे बरोबर नाही अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात व्यक्त केली आहे.

**सुप्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान याच्यावर गुरूवारी मध्यरात्रीनंतर त्याच्या वांद्रे येथील निवासस्थानी एका अज्ञात हल्लेखोराने चाकूने हल्ला केला. हल्ला झाला त्यावेळी सैफची पत्नी अभिनेत्री करिना कपूर घरी नव्हती. मुलांचा सांभाळ करणाऱ्या बाईचा आरडाओरडा ऐकून सैफ बाहेर आला व त्याने हल्लेखोराला अडवण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोर सेविकेच्या गळ्यावर चाकू रोखून १ कोटी रुपये देण्याची मागणी करत होता. तिच्या बचावासाठी सैफ सरसावला असता हल्लेखोराने सैफवर चाकूने वार करून त्याला जखमी केले असे सांगण्यात आले आहे. हल्लेखोर चोरीच्या उद्देशाने घरात शिरला असावा असे प्रथमदर्शनी दिसत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. परंतु इतकी नामांकित मंडळी राहात असलेल्या, सुरक्षा व सीसीटीव्ही व्यवस्था चोख असलेल्या इमारतीच्या १२व्या मजल्यापर्यंत हल्लेखोर बिनबोभाट पोहोचलाच कसा? घराचे 'फायर एक्झिट'चे दार उघडे कसे होते? हल्लेखोर चेहरा न झाकता पायऱ्या उतरून कसा पळाला? कुणी त्याला रोखले-पकडले कसे नाही असे अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहेत. विरोधकांनी मात्र संधी साधत लागलीच मुंबईच्या कायदा व सुव्यवस्था परिस्थितीविषयी राज्य सरकारवर टीका सुरू केली आहे. अशा घटनांना गांभीर्यानेच घेतले पाहिजे. परंतु त्यावरून संपूर्ण शहराला असुरक्षित म्हणू नये, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी यासंदर्भात व्यक्त केली असून ती योग्यच आहे. देशातील अन्य महानगरांपेक्षा मुंबई निश्चितपणे अधिक सुरक्षितच आहे. परंतु अलीकडच्या काळातील वांद्र्यातील काही घटनांमुळे मुंबईतील परिस्थितीविषयी प्रश्न उपस्थित करण्याची संधी विरोधकांनी साधली आहे. सैफ अली खान वरील चाकूहल्ला, सलमान खानच्या घराच्या दिशेने झालेला गोळीबार आणि वांद्र्यातील राजकीय नेते बाबा सिद्दीकी यांची भररस्त्यातील हत्या या घटनांमुळे विरोधकांना आयतेच कोलीत सापडले आहे. वास्तविक सैफ अली खान यांच्यावरील हल्ल्याच्या घटनेसंदर्भात अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहेत व त्यावरून थेट मुंबई शहराच्या कायदा व सुव्यवस्था परिस्थितीविषयी बोलणे हास्यास्पद आहे. पायऱ्या उतरून पळ काढणाऱ्या हल्लेखोराचा चेहरा सहाव्या मजल्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसला असून संध्याकाळी उशीरपर्यंत पोलिस त्याचा शोध घेत होते. बहुदा काही तास आधीपासूनच तो त्या घरात उपस्थित असावा असा संशय आहे. विरोधकांनी मात्र शहरातील कायदा व सुव्यवस्था स्थिती गंभीर असल्याची टीका सुरू केली असून यात उबाठा गटाच्या प्रवक्त्या प्रियांका चतुर्वेदी, राष्ट्रवादी (शरद पवार)च्या सुप्रिया सुळे, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल व तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांचा समावेश आहे. केजरीवाल यांनी तर केंद्र सरकारवरही निशाणा साधला. एकुणात, प्रत्येक घटनेतून राजकारण साधण्याचे आपले काम विरोधकांनी सुरू ठेवले आहे. दरम्यान, पोलिस तपासातून या घटनेविषयी अधिक तपशील बाहेर येऊन हल्ल्यामागचा नेमका हेतू स्पष्ट होऊ शकेल एवढेच आता म्हणता येईल.**

# बंदुक परवाने कशासाठी? शिकारीसाठी की दबंगगिरीसाठी?





**खबरबात**
**महेश शिंदे**

आजकाल कमरेला बंदुक लाऊन फिरण्याचे आणि दबंगगिरी करण्याचे प्रकार वाढू लागले आहे. समाजात दहशत निर्माण करणे आणि अपराधीक गुन्हे होण्यामागे या शस्त्र परवाना धारकांचा मोठा सहभाग असल्याचे दिसून येते. याचे ज्वलंत उदाहरण आपल्याला बीड मध्ये दिसून आले. या ठिकाणी गरज नसताना व दबंगगिरी करणाऱ्या जवळपास दोनशे जणांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले.

महाड तालुक्यात देखील अशाच प्रकारे शस्त्र परवाने असुन या मध्ये खरेच किती कोणाला गरज हा विषय या ठिकाणी संशोधनाचा आहे. आज तालुक्यात मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. तरुणांचा काही गृप अशा अवैध शिकारींमध्ये सक्रिय आहेत. जंगली प्राण्यांची वारेमाप शिकार करायची, तस्करी करायच्या घटना सातत्याने घडत आहेत. काही घटनांमध्ये हे महारथी पोलीस आणि वनरक्षकांच्या हाती लागतात. मात्र या मध्ये केवळ वाहन जप्त करण्या पलीकडे ठोस अशी कारवाई होताना दिसत नाही. तर काही महाभाग छंद म्हणून शिकार करतात. अशा अवैध शिकार दरम्यान गोळी लागून जबर जखमी होण किंवा मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत. नुकतीच माणगावमध्ये अशीच शिकारी दरम्यान एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर काही महिन्यांपूर्वी महाड शहरातील वडके कुटुंबातील अल्पवयीन शालेय विद्यार्थ्यांने घरातील बंदुकीची गोळी लागून मृत्यू झाला होता. शिकार हा प्रकार तर इतका भयंकर आहे की या शिकारी दरम्यान जर का कोण जखमी झाला किंवा गोळी लागून कोणाचा मृत्यू झाला तर कानोकान खबर न लावता प्रकरण परस्पर मिटविले जाते. अशा वेळी हा प्रश्न निर्माण होतो की मग यांना हे शस्त्र परवाने किंवा ही शस्त्रे कशासाठी लागतात ? जिव वाचवायला की जिव घ्यायला ? एखाद्याच्या शस्त्रामुळे एखाद्याचा जिव वाचला अशी घटना आपल्याला कधीच का ऐकायला मिळत नाही. स्वसंरक्षणाच्या नावाखाली आजकाल कोणालाही हे शस्त्र परवाने दिले जात आहेत. अशा वेळी त्या व्यक्तीची पत व समाजातले त्या व्यक्तीचे स्थान किंवा समाजाला त्या व्यक्तीची किती गरज आहे हे पाहणे देखील गरजेचे आहे. सुरक्षा तर सर्वांनाच हवी आहे मग शस्त्र परवानेदेखील सर्वांना द्यायचे का ? मग पोलीस यंत्रणा कशासाठी आहे ? शेतीच्या नावाखाली आज शेती न करणारे बरेच शेतकरी बंदुकधारी आहेत. जर कोकणातील ९० टक्के शेती ओसाड पडली आहे, तर शेती रक्षणासाठी ही शस्त्र परवाने कुठल्या शेतकऱ्यांना हवी आहेत. याची चौकशी नको का व्हायला.

महाड तालुका हा ऐतिहासिक व सुसंस्कृत तालुका समजला जातो. छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड आणि समतेचा संदेश देणारे चवदारतळे तसे वारकरी संप्रदायाची परंपरा असलेला हा महाड तालुका. याच तालुक्यातुन समतेचा आणि संघर्षाचा संदेश संपुर्ण भारतात पोहचविणार्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना स्वसंरक्षणासाठी कधी अशा शस्त्र परवाण्याची गरज लागली होती का? क्रांतीसिंह नानासाहेब पुरोहित, सुरबानाना टिपणीस, महाड नगरीचे शिल्पकार अण्णा सावंत यांना स्वसंरक्षणासाठी कधी शस्त्रांची गरज भासली नाही. मग आज आमच्या पिढीला याची गरज का ? कशा साठी ? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडच्या धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्रात अशाप्रकारे शस्त्रांचा गैर वापर करणार्यांचे शस्त्र परवाने रद्द करावे. खरे तर पोलिस प्रशासन सक्षम असताना कशाला हवेत हे शस्त्र आणि त्यांचे परवाने ? आज महाड तालुक्यात २०१ शस्त्र परवाने आहेत तर १९९ प्रत्यक्ष शस्त्र वापरात आहेत. आजचा हा विषय या ठिकाणी मांडण्याचा हेतु हाच आहे की जर का आम्हाला आदर्श समाज घडवायचा असेल तर अशा प्रकारे कोणालाच शस्त्र परवाने देण्यात येऊ नयेत.

सैनिक पोलीस आणि नोंदणीकृत सुरक्षा एजन्सी ना अशाप्रकारे शस्त्र परवाने अथवा वापर समजू शकतो, मात्र वैयक्तिक परवाने हे केवळ फसवणूक व समाजातील आपले वेगळे स्थान निर्माण करणे आणि दबंगगिरी करणे या साठीच आहेत का, असा प्रश्न निर्माण होतो. खरच जर कायदा सुव्यवस्था राखण्याची असेल तर हे सगळे शस्त्र परवाने रद्द करुन सरकारने एक आदर्श समाज निर्मितीचे उदाहरण दिले पाहिजे.

# कुटुंबनियोजनाच्या पुरस्कर्त्या शकुंतलाबाई परांजपे



स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात महाराष्ट्रात अनेक कार्यकर्ते वेगवेगळया विषयांकरता सामाजिक कार्य करत होते. काही द्रष्टया समाज सुधारकांनी काळाची पावले बरोबर ओळखून आणि समाजाला दिशा दाखवून काही सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. त्यामध्येच एक होत्या महिला सामाजिक कार्यकर्त्या शकुंतला परांजपे.

रँग्लर र. पु. परांजपे यांच्या त्या कन्या. त्यांचा जन्म १७ जानेवारी, १९०६ सालचा. शकुंतला परांजपे, त्यांची आई, त्यांची आजी आणि त्यांची मुलगी प्रसिध्द दिग्दर्शिका सई परांजपे ह्या चारही पिढयांचे शिक्षण पुणे येथील हुजूरपागेत झाले. आपल्या वडिलांप्रमाणेच शकुंतला परांजपे ह्या देखील केंब्रिज विद्यापीठाच्या पदवीधारक होत्या. बुध्दिमत्तेचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे आणि पुरोगामी विचारसरणीचे त्यांना घरातूनच बाळकडू मिळाले होते. त्यांच्या जवळच्या नातेवाईकांमध्ये अनेक प्रतिभावान मंडळींचा समावेश होता. त्यांच्या आचार-विचार यांचा काही अंशी परिणाम यांच्यावर निश्चितच झाला होता.

साहित्य, समाजकारण, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी संचार केला. बुध्दिमान, स्वतंत्र विचारांची आणि बुध्दिला पटेल तेच करणारी स्त्री अशी त्यांची ओळख होती. शकुंतलाजींच व्यक्तिरेखाटनाचं कौशल्य त्यांच्या लेखनातून अनेक ठिकाणी जाणवतं. ललित लेख, नाटक, कादंबरी असे वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले. कुटुंब नियोजनाच्या संदर्भात त्यांनी केलेलं स्वातंत्र्यपूर्व काळातलं कार्य त्यांच्या विचारांची दिशा आणि झेप दाखवतं.

जेव्हा संपूर्ण देश ब्रिटिशांशी स्वातंत्र्याकरता झगडत होता, तेव्हा ह्या स्वातंत्र्योत्तर काळात भारताला भेडसावू शकेल अशा प्रश्नाचं उत्तर शोधत होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात देशाची वाढती लोकसंख्या ही देशाच्या प्रगतीला मारक ठरू शकते, हे त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळात उमगलं होतं. त्यावर उपाय शोधून काढून त्या उपायासंदर्भात लोकांमध्ये जनजागृती घडवून आणण्याच्या कामी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. ते कार्य होते कुटुंब नियोजनाचे महत्त्व आणि उपयुक्तता लोकांना पटवून देण्याचे. ज्या काळी संततीनियमनाचे नाव घेणे हा देखील एक सामाजिक अपराध होता, त्या काळी एका स्त्रीने त्याकरता कार्य करणे म्हणजे मोठाच गुन्हा होता. पण तरीही न डगमगता, न अडखळता त्यांनी केले. मुंबईत र. धों. कर्वे यांच्या कडून शिक्षण घेऊन आल्यावर त्यांनी पुणे येथे आपल्या राहत्या घरी कुटुंबनियोजनाचे केंद्र सुरू केले. नातेवाईकांची नाराजी तसेच ह्या संदर्भातील एखादी सभा गावात घेत असताना बायकांना येऊ न देण्याचा पुरुषांचा प्रयत्न अशा असंख्य अडचणींवर मात करत त्यांनी हाती घेतलेले कार्य केले ।बद्दल त्यांना १९९१ मध्ये पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# आता 'ब्लिंकिट'वर लॅपटॉप, मॉनिटर, प्रिंटर करा खरेदी!

दैनंदिन जीवनात लागणाऱ्या आवश्यक गोष्टी, किराणा सामान अवघ्या काही मिनिटांत तुम्हाला घरपोच करणारा क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म 'ब्लिंकिट आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे, पण आता कंपनी खाण्या-पिण्याच्या पदार्थ आणि जीवनाश्यक वस्तूंनंतर इलेक्ट्रॉनिक्स विभागात पाऊल टाकणार आहे. 'ब्लिंकिट'चे सीईओ अल्बिंदर धिंडसा यांनी एक्स (ट्विटर) एक पोस्ट शेअर केली आहे.




आता 'ब्लिंकिट'द्वारे तुम्ही लॅपटॉप, मॉनिटर्स, प्रिंटर आणि बरेच काही थेट ऑर्डर करू शकणार आहात आणि फक्त १० मिनिटांच्या आतमध्ये तुम्हाला या वस्तू घरपोच डिलिव्हर केल्या जाणार आहेत.

हा उपक्रम 'ब्लिंकिट'ची आघाडीच्या इलेक्ट्रॉनिक्स ब्रॅण्ड्सशी असलेली पार्टनरशिप दर्शवितो आहे; ज्यामुळे ग्राहकांना तंत्रज्ञानविषयक वस्तू अगदी सहज खरेदी करणे शक्य होणार आहे. सध्या ब्लिंकिट तुम्हाला एचपी कंपनीचे लॅपटॉप, लेनोवो, झेब्रोनिक्स, एमएसआयवरून मॉनिटर्स, कॅनॉन व एचपीवरून प्रिंटर ऑफर करत आहे. भविष्यात इप्सॉन कॅटरिंजेसदेखील ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

'ब्लिंकिट'चे सीईओ अल्बिंदर धिंडसा यांनी सांगितले की, ही सेवा सध्या दिल्ली एनसीआर, पुणे, मुंबई, बंगळुरू, कोलकाता, लखनऊ या प्रमुख शहरांमध्ये सुरू करण्यात आली आहे. मोठ्या वस्तूंसाठी डिलिव्हरी विशेषत: ब्लिंकिटच्या खास लार्ज-ऑर्डर फ्लीटद्वारे हाताळली जाईल. त्याचप्रमाणे कंपनीने आपल्या पोर्टफोलिओचा आणखी विस्तार करण्याच्या योजनांचे संकेत दिले आहेत आणि लवकरच अधिक ब्रॅण्ड्स आणि उत्पादने आपल्या ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

लॅपटॉप, मॉनिटर्स, प्रिंटर यांसारखी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू फक्त १० मिनिटांत वितरित करण्याची 'ब्लिंकिट'ची नवीन सेवा ग्राहकांसाठी 'गेम चेंजर' ठरू शकते. पण, लहान स्टोअर्स आणि अधिकृत डीलर्सना यांमुळे समस्या निर्माण होऊ शकतात. या मॉडेलसह, ब्लिंकिट व्यापाऱ्यांना दूर सारून ग्राहकांना स्टोअरला भेट देण्याच्या त्रासाशिवाय स्पर्धात्मक किमतींत उत्पादने विकत घेण्याची सुविधा मिळवून देत आहे.

# गणितज्ञ दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर



**निमित्त**

दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर यांची गणितज्ञ अशी ओळख राहिलेली आहे. कापरेकरांच्या आयुष्यात त्यांच्या वाटेला अवहेलना आली. त्यांचे एक-दोन प्रबंध काही गणितांच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले, मात्र इतर सगळे नाकारले गेले, परंतु नाराज न होता कापरेकर आपले संशोधन नाशिकच्या साध्या प्रेसमधून छापून लोकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये वाटायचे. शहरी गणितज्ञ त्यांच्या शोधांची खिल्ली उडवायचे, मात्र कापरेकरांचे निधन झाल्यावर या सगळ्यांना त्यांच्या शोधांची महती व महत्त्व समजले.

एका मराठमोळ्या शाळामास्तरबद्दल ज्यांनी गणितातले उच्चशिक्षण घेतले नसतानाही कित्येक शोध लावले, त्यांच्या शोधांमुळे व कष्टाने त्यांना 'गणितानंद' ही उपाधी मिळाली. १७ जानेवारी १९०५ रोजी डहाणू येथे जन्म झालेल्या या माणसाचे नाव होते दत्तात्रय कापरेकर. वडील कारकून, त्यात वडिलांना ज्योतिषाचा अभ्यास करण्याची हौस होती. ज्योतिषात करावी लागते तितकी आकडेमोड वडिलांनी दत्तात्रयला शिकवलेली, पण दत्तात्रयाला तीच आवडली व त्याने तीच आकडेमोड आयुष्यभर केली. पुढे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला पदवी घेत असताना त्यांनी रँग्लर परांजपे ॲवॉर्ड मिळवले, जे गणिताच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांला मिळायचे. बीएस्सीची पदवी घेताच कापरेकर नाशिकजवळच्या देवळाली येथे शाळामास्तर म्हणून रुजू झाले ते आयुष्याच्या अखेपर्यंत तिथेच राहिले.

कापरेकरांचे संशोधन काळाच्या खूप पुढे होते, नंबर थिअरी म्हणून आज जिचा गवगवा आहे त्यातले कित्येक मूलभूत शोध कापरेकरांनी स्वतंत्ररीत्या लावले होते. त्यांनी लिहिलेल्या लेखांची मग पारायणे झाली, उजळण्या झाल्या. त्यांच्या लेखांवर कित्येक गणितज्ञ लोकांनी पीएच.डी. केल्या. 'माणूस मरावा अन् मग त्याची किंमत कळावी' हे कापरेकरांच्या बाबतीत खरंच घडले होते.

आता पाहूया दत्तात्रय रामचंद्र कापरेकरांचे काही खास शोध, त्यानिमित्ताने तुमच्या गणिताची उजळणीही होऊन जाईल. कापरेकर कॉन्स्टंट : ६१७४ ही संख्या कापरेकर कॉन्स्टंट म्हणून आज ओळखली जाते. तुम्ही कुठलीही चार अंकी संख्या गृहीत धरा, समजा आपण ४६३७ ही संख्या गृहीत धरू. आता या संख्येतील आकडे एकदा असे मांडा की, संख्या शक्य तितकी मोठी होईल व एकदा असे मांडा की संख्या शक्य तितकी लहान होईल. म्हणजे मोठी संख्या होईल ७६४३ आणि लहान संख्या ३४६७. आता लहान संख्या मोठय़ा संख्येतून वजा करा, तुम्हाला मिळेल ४१६७. आता ही संख्या (४१६७) कापरेकर पद्धतीने मांडून पुन्हा मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा.

तुम्ही जगातली कुठलीही चार अंकी संख्या घेऊन हा प्रयोग करू शकता, त्यांचे उत्तर हे एकतर शून्य येईल किंवा कापरेकर कॉन्स्टंट ६१४७. अचाट शोध लावणाऱ्या कापरेकरांचे आयुष्य मात्र हलाखीतच गेले, म्हातारपणी पेन्शन अपुरी पडू लागल्यावर त्यांना गणिताच्या शिकवण्या घ्याव्या लागल्या. १९५३ साली स्क्रिप्टा मॅथेमॅटिका या जर्नलमध्ये त्यांचा शोधनिबंध प्रकाशित झाला होता. ती जगाने घेतलेली त्यांची दखल होती. अखेर मार्टिन गार्डनर नावाच्या प्रसिद्ध गणितज्ञाने १९७५ साली सायंटिफिक अमेरिकन या जागतिक कीर्तीच्या विज्ञान मासिकात कापरेकरांच्या कामाबद्दल लिहिले. **-अजय महाडिक**

## बातमीतील बात




# आरोग्य प्रहर

## हिवाळ्यात श्वसनाशी संबंधित आरोग्य असे जपा

हिवाळ्यात तापमानात घट होते, त्याबरोबर प्रदूषणसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाढते. यामुळे श्वसनाशी संबंधित आजारांचा धोका वाढतो आणि आरोग्याच्या समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.



वाशी येथील फोर्टिस नेटवर्क हॉस्पिटलच्या जनरल मेडिसिन सल्लागार डॉ. सुजाता चक्रवर्ती सांगतात, श्वसनाशी संबंधित आजार वर्षभरात कधीही होऊ शकतात, पण काही कारणांमुळे हिवाळ्यात याचे प्रमाण जास्त आढळते.

**सर्दी :** सर्दी हिवाळ्यात अत्यंत सामान्य आजार आहे. हा सहसा सौम्य असला तरी संसर्गजन्य आहे. अनेक प्रकारच्या विषाणूंमुळे सर्दीचा त्रास उद्भवतो.

**इन्फ्लूएन्झा :** वातावरण दूषित झाल्यामुळे इन्फ्लूएन्झा हा रोग पसरतो. इन्फ्लूएन्झाला फ्लूसुद्धा म्हणतात. हा विशिष्ट इन्फ्लूएंझा विषाणूंमुळे होणारा विषाणूजन्य संसर्ग आहे, परंतु सामान्य सर्दीपेक्षा जास्त गंभीर आहे.

**ब्राँकायटिस :** जेव्हा फुफ्फुसात ऑक्सिजन वाहून नेणाऱ्या ट्यूब सूजतात तेव्हा खोकल्याचा त्रास उद्भवतो.

**न्यूमोनिया :** जेव्हा संसर्गामुळे फुफ्फुसातील ऑक्सिजनच्या पिशव्या द्रव किंवा खराब द्रवांनी भरतात, तेव्हा श्वास घेणे आणि रक्तप्रवाहास आवश्यक ऑक्सिजन पोहोचणे कठीण होते.

**सायनुसायटिस :** नाकाच्या आतील भाग (सायनस) फुगला किंवा सुजला तेव्हा ड्रेनेजमध्ये अडथळा निर्माण होतो आणि शेंबुड तयार होतो, ज्यामुळे नाक बंद होते आणि डोकेदुखीचा त्रास उद्भवतो

**खालील मुद्दे लक्षात ठेवा आणि आरोग्य जपा**

उबदार कपडे परिधान करा आणि शरीराचे तापमान नियंत्रित करा; आपले हात स्वच्छ ठेवा. तोंड, नाक किंवा डोळ्यांना अस्वच्छ हातांनी स्पर्श करणे टाळा; अवतीभोवती हवेची गुणवत्ता खराब असेल, तर सकाळी फिरायला जाणे टाळा. त्याऐवजी घरच्या घरी श्वसनाशी संबंधित योगा किंवा व्यायाम करू शकता; घर धूळ, बुरशीपासून स्वच्छ ठेवा. तुमचा बेड, गालिचे आणि सोफे नियमितपणे स्वच्छ करा; धूम्रपान करू नका आणि गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा; घरी चांगले व्हेंटिलेशन ठेवा; हिवाळ्यात भरपूर पाणी प्या. भरपूर फळे, भाज्या आणि प्रोटिनयुक्त पौष्टिक आहार घ्या. लिंबूवर्गीय फळे, हळद आणि आले रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करू शकतात; प्रक्रिया केलेले, जंक, तळलेले तसेच तेलकट खाद्यपदार्थ खाणे टाळा.

# रस्त्यावर थुंकणाऱ्या तरुणावर दंडात्मक कारवाई

**खोपोली, खालापुर : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील मुख्य बाजारपेठ समाज मंदिर रोडवर दुचाकी वरून जात असतांना सदर तरुण रस्त्यावर थुंकला . त्याच वेळी चालत असलेल्या दक्षता समितीच्या सदस्या शिल्पा मोदी यांच्या अंगावर ती थुंकी उडाली. शिल्पा मोदी यांनी सदर तरुणास थांबवून रस्त्यावर थुकने कायदेशीर गुन्हा असून, शहरातील स्वच्छता राखण्यासाठी योग्य नसल्याचे सांगितले, मात्र सदर तरुणाने उद्धाम पणे उत्तर देऊन दुर्लक्ष केले.


(संग्रहित छायाचित्र)

दरम्यान शिल्पा मोदी यांनी या बाबत खोपोली पोलिसांत रीतसर तक्रार दिली. पोलिसांनी गांभीर्याने या बाबत दखल घेत, सीसीटीव्ही च्या माध्यमातून त्या तरुणाची ओळख मिळविली. तो तरुण मूळ कर्जतचा रहिवासी असल्याचे स्पष्ट झाल्यावर, पोलिसांनी त्याला खोपोली पोलिस स्टेशनला हजर राहण्याची सूचना दिली.

त्यानुसार तो तरुण बुधवारी खोपोली पोलिसांसमोर हजर झाला .यावेळी त्याने माफी मागितली व भविष्यात असा प्रकार होणार नाही याची हमी दिली .मात्र वरिष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत यांनी रितसर कारवाई केली व सदर तरुणास खालापूर दंडाधिकारी समोर हजर करून दंडात्मक कारवाई झाल्यावर त्याची समज देऊन सुटका झाली. या कारवाईचे तक्रारदार शिल्पा मोदींसह शहरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी स्वागत करून कौतुक केले आहे.

**ही तक्रार कोणत्याही द्वेष भावनेतून केली नव्हती , तरुणांची अरेरावी बाबत त्याला समज मिळावी व स्वच्छता बाबत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने ही तक्रार दिली होती. रस्त्यावर अस्वच्छता करणे, थुकने शहराच्या स्वच्छता व आरोग्यासाठी योग्य नाही .पोलिसांनी विशेषतः वरिष्ठ पोलिस निरीक्षक शितल राऊत यांनी या बाबत स्वतः लक्ष टाकून योग्य कारवाई केली त्या बद्दल त्यांचे आभार .**

**–शिल्पा मोदी,**
**दक्षता समिती सदस्या**

## कर्जत शहरात दुचाकीची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील मुख्य बाजारपेठेतील महावीर कॉम्प्लेक्स मधुन ॲक्टिव्हा बनावट चावीचा उपयोग करून चोरट्यांनी पळवली. गेल्या काही दिवसांपासून कर्जत तालुक्यात चोरीच्या घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.

माजी नगरसेवक व व्यापारी जितेंद्र ओसवाल यांनी एम.एच. ४६ वाय ५१५ क्रमांकाची सफेद रंगाची होंडा क्टिव्हा कर्जत रेल्वे स्टेशनजवळील बाफना क्लॉथ स्टोअरच्या गल्लीत पार्क केली होती. ही गाडी चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास बनावट चावी लावून लंपास केली.पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. .

## राजिप शाळा कशेणेच्या विद्यार्थ्यांची एससीइआरटी पुणे येथे भरारी!

**माणगाव : प्रतिनिधी**

शिक्षण मंत्रालय दिल्ली व महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजित रंगोत्सव व समृद्धी कार्यक्रमात रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणे राज्यस्तरावर सादरीकरणासाठी पात्र ठरली.




संपूर्ण राज्यातील इयत्ता ३ री ते ८ वी मधील विध्यार्थी व शिक्षकांसाठी राज्यस्तरावर रंगोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अनुभवात्मक शिक्षणाच्या द्वारे विध्यार्थ्यांमध्ये सहयोग, स्वयं दिशा, स्वयं पुढाकार स्वयंशिस्त संघभावना जबाबदारी एकता व देशाभिमानाची जाणीव व जागृती निर्माण करण्यासाठी विविध शारीरिक कृती साहस आणि प्रेरणा यांचा अनुभव विद्यार्थ्यांना घेण्याची संधी देणे या उद्दिष्टाने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

या कार्यक्रमांमध्ये रा.जि.प. शाळा कशेणे मधील शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी टॉय बेस पेडॉगॉजी या तंत्रावर आधारित पाठाचे व्हिडिओ पाठवले होते. त्याचे मूल्यांकन होऊन जिल्ह्यामध्ये त्याचा नंबर आला. मुंबई विभागातून तीन व्हिडिओंची निवड राज्यस्तरासाठी करण्यात आली आणि यामध्ये कशेणे शाळेची निवड झाली.

या पाठाचे सादरीकरण पुणे येथे संचालक राहुल रेखावार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

## हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व मुस्लिम धर्मगुरूंच्या आशीर्वादाने डॉ. मैत्रेयी व डॉ. आदित्य यांचे विवाह बंधन



**पेण : प्रतिनिधी**

विवाह संस्था ही संस्कृतीस अनुलक्षून विविध पद्धतींनी पतिपत्नींमधले जवळकीचे आणि लैंगिक नाते मान्य करते. विवाहामुळे दोन व्यक्तींचे नव्हे तर दोन कुटुंबे आणि त्यांचे नातेवाईक नात्याने जोडले जातात, या नात्यास लग्नगाठ म्हणतात. सर्व धर्मात लग्न हे पवित्र बंधन आहे, या विवाह बंधनास सामाजिक एकता व लिंग समानतेच्या मूल्यात रूपांतर करण्याचे महत्वाचे कार्य आज पेणमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.वैशाली पाटील यांनी केले.

निमित्त होते तरुण भुलतज्ञ डॉ. मैत्रेयी वैशाली पाटील व महाड – पोलादपूर स्थित ऑर्थोपेडिक सर्जन डॉ.आदित्य नितीन मपारा यांच्या लग्न बंधनाचे. नुकत्याच पेण शहरातील सिसॉम लॉन्स येथे या सामाजिक जाणीव असलेल्या तरुण डॉक्टरांनी हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व मुस्लिम धर्मातील धर्मगुरूंच्या आशीर्वादाने आपले वैवाहिक जीवन सुरू केले. या वेळी आजी माजी न्यायाधीश, आयोगांचे सदस्य, आयएसएस् अधिकारी, कुलगुरू यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या सहजीवनाची शपथ घेतली. या आगळ्या वेगळया कार्यक्रमाला समाजातील विविध क्षेत्रातील व स्तरातील डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते व आदिवासी कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

या शानदार सोहळ्यात सर्व प्रथम वधू वरांचे अंकुर ट्रस्टच्या आदिवासी व अनाथ बालकांनी सुंदर नृत्य करुन् पुष्प वृष्टी करुन स्वागत केले. नंतर नवी मुंबई विपश्याना सेंटरचे बौद्ध भन्ते आर्यप्रज्ञा शाक्य व भन्ते अश्वमेध यांनी पाली भाषेत वधुवरास आशीर्वाद दिले तसेच मुस्लिम मौला अन्सर सुलतानी अल्हाबेदी व फादर रुडॉल्फ यांनी मुस्लिम व ख्रिश्चन धर्माप्रमाणे आशीर्वाद दिले. यानंतर राज्य सेवा आयोगाचे प्रभारी अध्यक्ष डॉ.दिलीप पांढरपट्टे, मानवी हक्क आयोगाचे सचिव आयएएस अधिकारी नितीन पाटील, मा.न्यायमुर्ती बी.जे.कोळसे पाटील, प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष व कुलगुरु डॉ. राजेंद्र विखे पाटील, मानवी हक्क आयोगाच्या रजिस्ट्रार न्या. स्वरूपा ढोलम यांनी एकत्रितपणे नवविवाहित जोडप्यास लिंग समभाव, सर्वधर्मसमभाव व सहजीवनाची शपथ उपस्थीत लोकांसमोर दिली. या कार्यक्रमांस अनेक वरिष्ठ शासकीय अधिकारी, राजकीय कार्यकर्त्यांनी आशीर्वाद दिले. तसेच प्रवरानगरच्या विखे पाटीलांनी सुवर्णा विखे यांचे समवेत उभायतास आशीर्वाद दिला.



### पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीर सूचना**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे.

१. पनवेल महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्रात असलेल्या H.T कनेक्शनच्या वीज देयकात लागणाऱ्या Excess Demand Penalty बंद करणे, Power Factor मध्ये सुधारणा करणेसाठी APFC Panel स्थापित करणे व H. T. कनेक्शनच्या वाढीव लोड मंजुरीनुसार नवीन मीटर क्युबीकल बसविणे व कार्यान्वित करणे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र. १५/१५/२०२५
दिनांक– १६/०१/२०२५

**सही/–**
**शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही **श्री. अमजद अझीझ मेहेरबख्श** यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – लोधीवली, तालुका – खालापूर, जिल्हा – रायगड.**

| भुमापन नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०२/२ | १–६८–६० पो.ख. ०–२२–०० एकूण १–९०–६० **पैकी १–५०–६०** | ३१.२६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीबाबत **श्री. अमजद अझीझ मेहेरबख्श** यांचे मालकी हक्क निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल.
दि. १६/०१/२०२५.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २. आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **दीक्षा कैलास घरत व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
(PU-ID : 27612625145), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७/४ खाते क्रमांक : ५४० | १ | ०.४१.०० पो.ख. ०.०२.२० | ४.८७ |
| | | एकुण ०.४३.२० | |

**एकुण क्षेत्र ०.४३.२० गुंठे यापैकी ०.१६.०० गुंठयाचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०१/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड – ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–नेरे, ता.–पनवेल, जि.–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**– मिळकतीचे वर्णन –**
**मौजे – नेरे, ता. – पनवेल, जि. – रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| नेरे | श्री. मेघनाथ नारायण म्हसकर श्री. रामचंद्र नारायण म्हसकर श्री. संभाजी नारायण म्हसकर श्री. शामकांत नारायण म्हसकर | १९० | – | ०.५७.२० हे.आर.पॉ. | २.०० |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०१/२०२५

**सही/–**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**

पत्ता – शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को.ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर– ५, नवीन पनवेल, ४१०२०६

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुकेश हिम्मतराव चौधरी, ४०२, मानसी हाईटस्, प्लॉट नं. २/३,सेक्टर ८ नवीन पनवेल | ०१ गिरीपुष्पा झाड, तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १२,सेक्टर–८,नवीन पनवेल (पूर्व) येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०१ फणस, ०१ उंबर, ०१ जाभुळ, ०१ पेरु व ०१ पिंपळ अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील रोहिदास वाडा येथील गटर व रस्ता बांधकामास बाधित होत आहे. |
| ३ | मे. ॲडमायर इन्फ्रा तर्फे भागीदार श्री.जेठा करमशी बेरा व इतर ०१ बी–१०,ओमकार अपार्टमेंट, बिल्डिंग नं.१७, रुम नं.१०४, सेक्टर–१५,वाशी, नवी मुंबई ४००७०३. | ०१ बदाम,०४ शेवगा,०४ आंबा ०१ पेरु,०१ गुलमोहर,०२ जंगली,०१ नारळ ०१ सुपारी व १ फणस अशी एकूण १६ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भुखंड क्र. २२४, सेक्टर–१९, खारघर, नवी मुंबई येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ४ | अध्यक्ष/सचिव, रुक्मिणी निवास सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं. ७१, मिडलक्लास हौ. सोसायटी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ०३ आंबा व ०१ जांभुळ अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील रुक्मिणी निवास सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.७१, मिडलक्लास हौ. सोसायटी, पनवेल, ता.पनवेल जि.रायगड येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.१७/१७/२०२५
दिनांक : १६/०१/२०२५

**सही/–**
**(स्वरुप खारगे)**
सहा आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका

### Public Notice

Service Request Number: RGD/24852/18/24
Inquiry/case No.: 465/24
Name of the Trust : NARHARI EDUCATION TRUST
Address of the Trust: Shop No. 3, Saniddhya 2 Co-Op. Housing Society Ltd., Plot No. 122, Sector-34, Kamothe,. Navi Mumbai Raigarh, Alibag,
Registration Number of the Trust (if) : NARHARI EDUCATION TRUST
Name of the Applicant : ARVIND HARI SAWANT

To
All Concerned having interest

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region.
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property** : Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**immovable Property**

| SRNO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

**Value of Immovable Property** : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 23/12/2024.

**Sd/-**
I/C **Superintendent**
Public Trusts registration Office,
Raigad

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे सांगटोली, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री मेघनाथ पांडुरंग पालकर व मंगेश पांडुरंग पालकर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे सांगटोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| ६/२/अ | १ | १–२६–०० | ०–००–०० | १–२६–०० पैकी ०–२०–०० विक्रीदार यांच्या मालकी व ताबेकब्जातील क्षेत्र | ४.०८ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०१/२०२५

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए, एलएल. बी.
(खरेदीदाराचे वकिल)

कार्यालयीन पत्ता : बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

# नवी मुंबईतील सीसीटीव्ही कॅमेरे दुय्यम दर्जाचे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने साधारण तीन वर्षांपूर्वी शहरात सुमारे १५० कोटी रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. उत्तम दर्जाचे कॅमेरे बसविण्यात आल्याचा दावा पालिकेने केला आहे. या कॅमेऱ्यांमुळे शहरातील सुरक्षितता वाढेल, पोलिसांना गुन्हेगारीवर आला घालण्यास मदत होईल, गुन्हेगार शोधताना मदत होईल असे दावे पालिकेकडून करण्यात आले होते, मात्र हे दावे फोल ठरण्याचा आरोप सीवुड्सचे माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी केला आहे.

हे सीसीटीव्ही कॅमेरे दुय्यम दर्जाचे असल्याचा आरोप माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी केला आहे. बेलापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



सीवूड्स विभागात मागील काही कालावधीपासून चोरी आणि घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून काही महिन्यांपूर्वी प्रभागातील एका महिलेचा अपघात झाला होता. या

- विविध गुन्ह्यांच्या तपासासाठी फूटेज मिळत नसल्याचे उघड
- आरोपी शोधताना होतायत अडचणी
- नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ

घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पाहण्यासाठी गेल्यावर हे सीसीटीव्ही कॅमेरे सुरू नसल्याचे आढळून आल्याचे डोळस यांनी सांगितले. त्यामुळे अशा कॅमेऱ्याचा उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. जुने फुटेज दाखविण्याची विनंती केल्यावर महापालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराने साधारण कॅमेरे बसविल्याचे आढळून आल्याचे त्यांनी सांगितले. त्या कॅमेऱ्यात रेकॉर्ड होणाऱ्या वाहनांचा नंबरसुद्धा व्यवस्थित टिपत नसल्याचे डोळस यांनी सांगितले. त्यामुळे दर्जाहीन कॅमेरे बसवणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करावी? पालिका नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळत असल्याचा आरोप विशाल डोळस यांनी केला आहे.

महापालिका आयुक्तांनी याबाबत चौकशी करून कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी, तसेच संपूर्ण नवी मुंबईत सध्या लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे काढून हायफिक्सेल, हायरिझोल्युशनचे कॅमेरे लावण्याची मागणी त्यांनी केली आहे.

सीवूड्समधील नागरिकांसह पालिकेच्या संबंधित विभागाकडे जाब विचारला जाईल आणि या घोटाळ्याबाबत संबंधितांवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा डोळस यांनी दिला आहे. दरम्यान, हे कॅमेरे उत्तम दर्जाचे असल्याचा दावा पालिकेने केला आहे.

# वृद्ध महिलेला पाच लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

बँक ऑफ इंडियाचा अधिकारी असल्याचे भासवून सायबर टोळीने खारघर येथील बँकेच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या, ज्येष्ठ नागरिक असलेल्या पत्नीला गंडा घातला. बँकेत ठेवलेल्या पाच लाख रुपयांच्या फिक्स डिपॉझिटची मुदत संपलेली नसतानाही बोलण्यात गुंतवून एफडीची रक्कम मुदतीपूर्वी परस्पर ऑनलाइन काढू घेण्यात आली. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करून या टोळीचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ६८ वर्षीय वृद्ध महिला खारघर सेक्टर-१० मध्ये कुटुंबासह राहण्यास आहे. या महिलेचे पती बँकेमध्ये असिस्टंट मॅनेजर या पदावर



कार्यरत होते. २०१५ मध्ये ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना मिळालेल्या पेन्शनमधून त्यांनी पाच लाख रुपयांच्या मुदत ठेवी काढल्या होत्या. एका सायबर टोळीने गत १५ डिसेंबर रोजी सकाळी ११च्या सुमारास या महिलेच्या मोबाइलवर संपर्क साधला. बँक ऑफ इंडियाच्या बीकेसी येथील मुख्यालयातील अधिकारी असल्याचे भासवले. तसेच ही महिला व तिच्या पतीबाबत माहिती सांगितली. त्यामुळे या महिलेने बँकेतील फोन असल्याचे समजून आपल्या पतीला फोन दिला.

सायबर टोळीने महिलेच्या मोबाइलवर व्हॉट्सअॅप व्हिडीओ कॉल करून त्यांना बोलण्यात गुंतवून ठेवले. तसेच त्यांच्या खात्यातून प्रथम १५ हजार रुपये व त्यानंतर चार लाख ४५ हजार रुपयांच्या मुदत ठेवीची रक्कम परस्पर काढून घेतली. याबाबतचे मेसेज या महिलेच्या मुलीच्या मोबाईल फोनवर गेल्यांनतर मुलीने त्यांच्याकडे याची चौकशी केली. त्यानंतर सायबर टोळीने त्यांच्या मुदत ठेवींची मुदत संपली नसतानासुद्धा तारखेच्या अगोदर मुदतपूर्व ठेवी मोडून चार लाख ८५ हजारांची रक्कम परस्पर काढून घेतल्याचे त्यांच्या लक्षात आले. या महिलेने प्रथम एनसीसीआर पोर्टलवर तक्रार दाखल केली, नंतर त्यांनी खारघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# सीबीडीमध्ये आजपासून कला-क्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने सिबिडी सेक्टर १ येथील सुनील गावस्कर मैदानात १७ ते २६ जानेवारी २०२५ दरम्यान सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे निमंत्रक आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी १७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वा. विशेष महिलांच्या हळदी-कुंकू समारंभाने होणार आहे. १८ जानेवारी सांय ५ ते ७ वाजता चित्रकल व मेहंदी स्पर्धा व सांय ७ ते ९ वाजता आगरी कोळी गीतांचा लाईव्ह कार्यक्रम, १९ जानेवारी सांय. ७ वाजता आशीमिक कामठे प्रस्तुत लावणी महोत्सव, २० जानेवारी सांय ५ ते ७ वाजता पाककला स्पर्धा व सांय ७ ते १० आम्ही दोघे राजाराणी (होम मिनिस्टर), २१ जानेवारी सांय ७ ते १० शालेय समूह नृत्य स्पर्धा, २२ जानेवारी सांय ७ ते १० महामानवाची संगीतमय गाथा, २३ जानेवारी सांय ७ ते १० वाजता हिंदी गीतांचा कार्यक्रम प्रमुख पाहुणे पद्मश्री शंकर महादेवन, २४ जानेवारी सांय ७ ते १० मराठमोळा फॅशन शो, हास्यकल्लोळ, समूह नृत्य व वेशभूषा स्पर्धा, २५ जानेवारी सकाळी ९ ते दु. २ वाजता महाआरोग्य शिबीर व सांय ६ ते १० वारसा माझ्या महाराष्ट्राचा तसेच रविवार २६ जानेवारी सांय ६ ते १० वाजता धमाल मराठी लावणी कोळी गीते आदि विविध कार्यक्रम असणार आहे असे आ. म्हात्रे यांनी सांगितले.

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था सलग २८ वर्षे विविध उपक्रम करत आहे. या महोत्सवात विविध समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम, संस्कृतीदर्शक चित्र प्रदर्शन, खाद्य संस्कृती, भव्य फनफेअर आहे. तसेच स्थानिक लोककला व लोकपरंपरेचे जतन व्हावे, नवोदित कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देतानाच जुन्या जाणत्या कलावंतांचा गुणगौरव व्हावा, सांप्रदायिक एकता व एकात्मता वृद्धिंगत व्हावी, हाच उद्देश समोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून महोत्सवात प्रवेश हा निशुल्क असल्याने आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

# ग्रामीण महिलांना कुक्कुट पिल्लांचे वाटप



**उरण : वार्ताहर**

पशुसंवर्धन विभामार्फत उरण तालुक्यात ग्रामीण भागातील महिलांसाठी ५० टक्के अनुदानावर महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात आली. पंचायत समिती सेस फंडातून गट विकास अधिकारी समीर वाठरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेचा दुसरा टप्पा पुर्ण करण्यात आला.

मागील तीन - चार वर्षांपासून ग्रामीण भागातील महिलांकडून कुक्कुट पिल्लांच्या योजनांची मागणी होत होती. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने कुक्कुट पिल्लांसाठी उरण तालुक्यातून अर्ज मागविले होते. प्राप्त झालेल्या एकूण ७६ अर्जांपैकी ५० लाभार्थ्यांची निवड झाली. सदर लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी ६० पिल्ले प्रमाणे शासकीय अनुदानातून एकुण ३००० पिल्लांचे आरक्षण केंद्रीय कुक्कुट विकास संस्था, गोरेगाव मुंबई येथे करण्यात आले.

पहिल्या टप्प्यात उरण परिसरातील २५ लाभार्थ्यांना प्रत्येकी साठ पिल्ले वाटप करून त्यांना कुक्कुट पक्षी संगोपणाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. आज दुसऱ्या टप्प्यात चिरनेर, पिरकोन, विंधणे, वेश्वी व चिर्ले भागातील २५ लाभार्थ्यांना सहाय्यक गट विकास अधिकारी संतोषसिंग डाबेराव यांच्या हस्ते चिरनेर येथे एकूण १५०० पिल्लांचे वाटप करण्यात आले आहे.

प्रशिक्षणदरम्यान कुक्कुट पिल्लांचे खाद्याचे नियोजन, थंडीपासून संरक्षण होण्यासाठी ब्रुडर व्यवस्था तसेच लसीकरण इत्यादींची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली. लाभार्थ्यांनी गरजेनुसार उपचार व लासिकरणासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ. सोमनाथ भोजने यांनी केले आहे.

# शिरवणे, वाशी गटाच्या शिष्यवृत्ती सराव परीक्षा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत शिरवणे-वाशी समूह साधन गटाची शिष्यवृत्ती सराव परीक्षा क्र.१ रविवारी नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १५ व शाळा क्र. २८ येथे आयोजित करण्यात आली होती. शिक्षण उपायुक्त संघरत्ना खिलारे, शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली



संपन्न झालेल्या या सराव शिष्यवृत्ती परीक्षेस एकूण २५४ विद्यार्थी बसले होते.

या सराव परीक्षेमुळे पेपर वेळेत कसा सोडवावा ?मुद्देसूद उत्तरे कशी लिहावीत ? कोणत्या विषयाचा कसा अभ्यास करावा ? याची अनुभूती घेता आली. यामुळे मुख्य परीक्षेच्या वेळी येणारे दडपण कमी होणार आहे. पर्यायाने गुणांच्या टक्केवारीत वाढ होण्यास मदत होईल असे विद्यार्थ्यांनी सांगितले. केंद्रसमन्वयक प्रशांत म्हात्रे, मुख्याध्यापक जगदीश टोले, प्रभारी मुख्याध्यापिका रंजना साळी यांच्या संयोजनाखाली या परीक्षा मुख्य परिक्षेसारख्याच शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या.

# पारगाव येथील शाळेत विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत मानक संस्था ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड( बी.आय. एस) च्या मुंबई शाखेच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या दापोली-पारगाव येथील अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानावर आधारित बहुपर्यायी प्रश्नांची प्रश्नमंजुषा स्पर्धा, पोस्टर,स्लोगन,मीम्स व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धा भारत मानक ब्युरोच्या विद्यालायात स्थापन करण्यात आलेल्या संचालिका पाटील सी.जी.व



विद्यालयाच्या उपशिक्षिका एस.एस. मुंबईकर यांनी घेतल्या. या स्पर्धांचे उद्घाटन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.पुष्पलता ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन ही केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या शिक्षिका कल्याणी भोपी व दीपा फडके मॅडम उपस्थित होत्या.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख रकमेची पारितोषिक देण्यात येणार असल्याची माहिती बी.आय. एस.च्या वतीने करण्यात आली.

# उरण येथे आज कविसंमेलन

**चिरनेर : प्रतिनिधी**

उरण कोमसाप मधुबन कट्ट्याचे १११वे कवी संमेलन उरण येथील विमला तलाव येथे शुक्रवार (दि.१७) सायंकाळी ५ वाजता रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. काव्य संमेलनात देशभक्तीपर विषयांवर काव्यवाचन तसेच क्रांतिवीरांच्या जीवनावर आधारित चारोळ्या सादर होणार आहेत.

या काव्य संमेलनाच्या कार्यक्रमात जीव रक्षक बोट कॅप्टन सुनील धर्मा कोळी (बेलपाडा) आणि समालोचक व निवेदक श्याम गोकुळ ठाकूर (धुतुम) यांना मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, कार्यक्रमात गझलकार आप्पा ठाकूर यांची गझल ऐकावयास मिळणार आहे. तर या वेळी अशोक ठाकूर हे हिप्राटाईज व आरोग्य सल्ल्यावर मार्गदर्शन करणार आहेत.

कोमसाप उरणचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे, उरण मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कोमसाप जिल्हा प्रतिनिधी संजय होळकर, कोमसाप उरण कार्याध्यक्षा रंजना केणी, समता ठाकूर, कोमसाप शाखा उरणचे सचिव अजय शिवकर, सर्व सदस्य या संमेलनाच्या तयारीसाठी मेहनत घेत आहेत.

# अधिकारी, कर्मचारीवृंदाचा सांस्कृतिक कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या ३३ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून अधिकारी, कर्मचारी यांच्या अंगभूत कला, क्रीडागुणांना वाव देण्यासाठी विविध खेळांचे स्पर्धात्मक उपक्रम यशस्वी रितीने राबविल्यानंतर आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात गीत, नृत्य, नाट्य आदी सांस्कृतिक सादरीकरण उत्साहात झाले.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या वेळी उपस्थित राहून सादरीकरण करणाऱ्या कलावंताचे भरभरून कौतुक केले. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी शेरोशायरीची बरसात करीत जिंदादीलपणे सादर केलेल्या २ बहारदार गाण्यांनी कार्यक्रमाची उंची वाढविली. समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, शिक्षणाधिकारी अरूणा यादव या अधिकाऱ्यांनीही



टाळ्यांची दाद घेत कलात्मक सादरीकरण केले.

या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये २५ वैयक्तिक गायन, ५ समुह गायन, १० वैयक्तिक नृत्ये, ९ समुह नृत्ये व ३ नाटिका अशाप्रकारे अप्रतिम कलाविष्कार अधिकारी - कर्मचारीवृंदाने जल्लोषात सादर केले. या वेळी महानगरपालिकेचे विभागप्रमुख व अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीर वाजेकर महाविद्यालयात दि.बा.पाटील यांची जयंती

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालय महालन विभाग, फुंडे येथे लोकनेते दि.बा. पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते प्रा. दिलीप केंगार यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जीवन चरित्राचा



आढावा घेताना त्यांचे शिक्षण, समाजकारण, राजकारण, आदी क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या प्रेरणादायी जीवन कार्यावर भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. सुजाता पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. संदीप घोडके, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. झेलम झेंडे, ग्रंथपाल सुप्रिया नवले, प्रा. बी.पी पवार, प्रा. योगेश कुलकर्णी आणि प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण महाविद्यालयात निवडणूक जनजागृती

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, भारत निवडणूक आयोग व तहसील कार्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात मतदान करणे महत्त्वाचे आहे मी निश्चितच मतदान करतो या विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. यामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मेहंदी स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.जी लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या



स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या वेळी आय. क्यु.ए.सी समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.दत्ता हिंगमिरे व सहकार्यक्रमाधिकारी प्रा.सौ विनिता तांडेल यांनी केले. महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार वरील स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयात केले गेले.

क्लिक...क्लिक...!



**नवी मुंबई : स्वच्छतेइतकेच पर्यावरणाकडे लक्ष देत महापालिकेच्या आठही विभागांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा सुरू आहेत.**

# एफ.जी नाईक महाविद्यालयात भूगोल दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ.जी नाईक महाविद्यालय भूगोल विभागाअंतर्गत भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले. भूगोल दिन १४ जानेवारी या निमित्ताने प्रासंगिक गेली तीन दशके पूर्ण महाराष्ट्रातील विविध संस्था महाविद्यालय भूगोल दिन साजरा केला जातो.

निसर्ग आणि माणूस यांचा पूरक आणि प्रेरक संबंध मांडताना या दिवसाचे महत्व आणि तत्व जाणावे म्हणून सुरुवात १४ जानेवारी १९८८ या रोजी केली. भूगोल महर्षी डॉ. सी.डी देशपांडे यांचा जन्मदिन ही या दिवशी असतो

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून एफ.जी नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक होते त्याचबरोबर भूगोल विषय शिक्षक प्राध्यापिका डॉ. कविता पवार तसेच शिक्षक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

भूगोल विषय प्राध्यापक डॉ.कविता पवार यांनी



भूगोल विषयाबद्दल माहिती तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पाऊल उचलने खूप महत्त्वाचे आहे याबद्दल माहिती सांगून भूगोल विषयाचे महत्त्व हे स्पर्धा परीक्षेमध्ये खूप वाढला आहे आणि असा अभ्यास करणं खूप गरजेचे आहे, असे सांगून भूगोल दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी एफ. जी. नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.

मॉडेल मेकिंगचे एकूण चार बक्षीस जाहीर करण्यात आली त्यामध्ये पहिला क्रमांक पृथ्वीचे अंतरंग, दुसरा क्रमांक वातावरणाचे थर, तिसरा क्रमांक अन्नजाळी अन्नसाखळी व चौथा क्रमांक ग्रामीण व शहरी वसाहतीतील फरक अनुक्रमे देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी.वाय.बी.ए ची विद्यार्थिनी कु. अंकिता गोळे हिने केले व सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ. कविता पवार यांनी मानले.

# भटक्या कुत्र्यांमुळे माणगावकर हैराण

## बंदोबस्त करण्याची नागरिकांची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मुख्य रस्त्यावर फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. माणगाव नगर पंचायत हद्दीतील, मोर्बा, मोर्बा रोड, खांदाड, भादाव, उतेखोल, साईनगर, दत्तनगर या परिसरातदेखील मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांची वाढ झाली असून रात्री कामावरून येणाऱ्या लोकांच्या अंगावर हे कुत्रे धाऊन जात आहेत. तसेच रात्रभर जोर जोरात भुंकत, रडतदेखील असतात. या कुत्र्यांमुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत.

ही भटकी कुत्री अपघातांना देखील कारणीभूत ठरत असून या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी अनेकदा करूनही प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. शहरातील वर्दळीची ठिकाणे,अंतर्गत असणाऱ्या भागातील ही कुत्री रस्त्याच्या



मधोमध उभी अथवा बसलेली असतात वारंवार रस्त्यावरून ये-जा करतात. यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना चांगलीच कसरत करावी लागते. तसेच घराबाहेर ठेवलेली पादत्राणे देखील ही कुत्री चावून इतरत्र टाकीत असतात. त्यामुळे पादत्राणे शोधण्यात नागरिकांचा नाहक वेळ वाया जातो. कधी नवीनच पादत्राणे ह्या कुत्र्याने चावल्याने पुन्हा नवीन पादत्राणे घेण्याची वेळ येते. टोळीने फिरणाऱ्या गुरां मध्ये आता कुत्र्यांची भर पडली आहे.

भटकी कुत्री अनेकदा नागरिकांवर हल्लेही करतात. अशा घटना यापूर्वी शहरात घडल्या असल्याने त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी भटकी कुत्री यांचा बंदोबस्त करण्याची मागणी माणगाव मधील नागरिक करत आहेत. मोर्बारोड परिसरात असलेल्या कचराकुंड्यांवर, हॉटेल बाहेरील कचराकुंड्यांवर तसेच हॉटेलमधील शिळ्या पदार्थांवर या कुत्र्यांची गुजराण होत असल्याने याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

नगर पंचायत हद्दीतील मोर्बारोड, खांदाड, दत्तनगर,कचेरी रोड, शहरातील सर्वच मुख्ये रस्ते, शाळा - महाविद्यालय परिसर इत्यादी भागांत या कुत्र्यांचे वास्तव्य आहे. एकीकडे शहरातील वाहतूक व्यवस्थेचा खेळखंडोबा चालू असतानाच या मोकाट भटक्या कुत्र्यांमुळे माणगावकर नागरिक हैराण झाले आहेत. प्रशासनाने यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असून,नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्त करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**माणगांव शहरातील बाजारपेठ निजामपूर रोड, मोर्बारोड, कचेरी रोड, अन्य सार्वजनिक ठिकाणी भटक्या मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. ही कुत्री दुचाकीस्वार व चारचाकी वाहन चालक यांचा पाठलाग करतात त्यामुळे माणगावमध्ये दुचाकी अपघातांचे प्रमाण वाढले आहे तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नदेखील ऐरणीवर आहे, माणगांव नगरपंचायत प्रशासनाने याची गंभीर दखल घेवुन योग्य ती कार्यवाही करावी.**
**-सहदेव खराडे, नागरिक/ ग्रामस्थ-उतेखलवाडी, माणगांव**

# खालापुरात रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात

**खोपोली : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम खात्याने खालापूर शहरातील सोमेश्वर सोसायटीतून मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग ते खालापूर शहर असा साधारण पाचशे मीटरचा जोड रस्ता दुरुस्तीला सुरुवात केली आहे.

हा जोड रस्ता गेल्या बारा वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत होता. रस्त्याची दुरावस्था झाल्याने पायी चालणेदेखील मुश्किल झाले होते. धुळीचा त्रास शिवाय पायी चालत जाताना देखील अनेक ज्येष्ठ नागरिक पडून दुखापत झाल्याने सोसायटीतील ज्येष्ठ नागरिकांनी प्रशासनाला निवेदन दिले होते. कोणत्याही परिस्थितीत रस्ता करा अन्यथा प्रजासत्ताक दिनी उपोषणाला बसण्याचा निर्धार सत्तरी ओलांडलेल्या चार वयोवृद्धाने केल्याने प्रशासन तातडीने कामाला लागले आहे.



# रविवारी वेध अलिबाग कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यासान एज्युकेशनल फाउंडेशन, अलिबाग आणि इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजीकल हेल्थ (आयपीएच), ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आरसीएफ वसाहतीमध्ये रविवारी (दि. १९) वेध अलिबागचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत भूतपूर्व आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर, चला हवा येऊ द्या चे पत्रलेखक अरविंद जगताप, मायक्रोसॉफ्टचे डायरेक्टर चिन्मय गवाणकर, एकल प्रवासी आभा चौबळ यांसह डिझाईन जत्रा या आगळया सामाजिक-स्थापत्य संस्थेच्या वास्तुविशारदांच्या मुलाखती विख्यात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी घेणार आहेत.

आयोजित वेध-अलिबाग २०२५ची थीम आहे, 'रंग-उमंग'. यात भूतपूर्व आयपीएस अधिकारी मिरां चड्ढा बोरवणकर, संवेदनशील साहित्यिक अरविंद जगताप, कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ चिन्मय गवाणकर, एकल प्रवासी आभा चौबळ आणि डिझाईन जत्रा या सामाजिक-स्थापत्य संस्थेचे वास्तुविशारद विनिता कौर एम. चिरागिया, प्रतीक धनमेर, शार्दुल पाटील अशा विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्वांच्या जीवनप्रवासाचे रंग उलगडले जाणार आहेत. या सुविख्यात व्यक्तींच्या यशस्वीतेमागची ऊर्जा, उत्साह (उमंग) डॉ. नाडकर्णी घेत असलेल्या मुलाखतींच्या माध्यमातून जाणून घेण्यासाठी अलिबाग परिसरातील विद्यार्थ्यांसह सुजाण नागरिक उत्सुक आहेत.

या कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक म्हणून आरसीएफ लिमिटेड तर सह प्रायोजक म्हणून आदर्श नागरी पतसंस्था व गेल (इंडिया) यांचे सहाय्य लाभले आहे. जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यासान एज्युकेशनल फाउंडेशन, अलिबाग तर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमातील सहभागासाठी ८६९८७९५७९६ (उमेश वाळंज) किंवा ९८५०९६५४५२ (अनिल आगाशे) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# इस्त्रायलच्या महावाणिज्यदूतांची अलिबागच्या ज्यू धार्मिक स्थळांना भेट

**अलिबाग : प्रतिनिधी**

इस्त्रायलचे महावाणिज्यदूत कोब्बी शोशानी यांनी मंगळवारी (दि. १४) अलिबाग तालुक्यतील ज्यू धार्मिक स्थाळांना भेट दिली. त्यांनी ज्यू समाज स्मशानभूमींची देखील पाहणी केली.

कोब्बी शोशानी हे सध्या मुंबईत इस्त्रायलचे कौन्सुल जनरल म्हणून काम पाहत आहेत. ते महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि गोवा येथे इस्त्रायल राज्याचे अधिकृत प्रतिनिधी आहेत. मंगळवारी त्यांनी तुडालदेवी स्मशान भूमी रेवदंडा बिथ एई सिनेगॉगला व ज्यु समाज स्मशानभूमी चौल येथे भेट देऊन पाहिणी केली. त्यानंतर त्यांनी अलिबाग सिनेगॉग ला भेट दिली. तेथून ते नवगाव येथे गेले. नवगाव येथील ज्यू समाजाच्या स्मशानभूमींची देखील पाहणी केली. या वेळी त्यांच्या सोबत रायगड ज्यूईस असोसिएशनचे



अध्यक्ष हेर्जल भोनकर, सचिव बेंजामिन वासकर, खजिनदार अब्राहम आवास्कर यांच्यासह दहा ते पंधरा ज्यू समाजाचे नागरिक, तसेच कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हजर होते.

शोशानी यांनी यापूर्वी अनेकदा भारताला भेट दिली आहे. १९९२ मध्ये भारतामधील पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांना भारतात पाठविण्यात आले होते. नवी दिल्लीत इस्त्रायालचा दूतावास स्थापन करण्यात भाग घेतला . २००८ आणि २०१८ मध्ये २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर कोब्बी यांना परराष्ट्र मंत्रालयाने मुंबईला पाठवले होते.

**इस्त्रायली समुदायाच्या मालमत्तांचे संरक्षण**

अलीकडच्या काही वर्षांत बरेचजण इस्त्रायलला स्थलांतरित झाल्याने जिल्ह्यातील ज्यू समुदायाची लोकसंख्या कमी झाली आहे. त्यांची व्यक्तिगत आणि समाजाची मालमत्ता जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आहे. यातील अनेक ठिकाणी अतिक्रमण होत आहे. याबाबत शोशान्नी यांनी इथल्या समाजाच्या प्रमुखांशी चर्चा केली. याबाबत ते राज्य सरकारशी चर्चा करून अतिक्रमण थांबवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील असे रायगड जिल्हा ज्युईस असोसिएशनचे अध्यक्ष हेर्जल भोनकर यांनी सांगितले.

# पुस्तक पुनरावलोकन स्पर्धेत 'अंजुमन'च्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा येथे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली १३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात पुस्तक पुनरावलोकन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी वाचलेल्या विविध पुस्तकांचा सखोल अभ्यास मांडत



प्रभावीपणे पुनरावलोकन सादर केले. त्यामध्ये कथा, काव्य, आत्मचरित्र, विज्ञान आणि इतिहास अशा विविध विषयांवरील साहित्य समाविष्ट होते. पुस्तक वाचन हे मनाच्या आणि विचारांच्या समृद्धीसाठी अत्यावश्यक आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

पुस्तक पुनरावलोकन ही विद्यार्थ्यांसाठी वाचन अनुभव अधिक समृद्ध करणारी आणि त्यांची विचारप्रक्रिया प्रगल्भ करणारी स्पर्धा आहे. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. अलताफ फकीर आणि प्रा. जावेद खान यांनी केले. उत्कृष्ट पुनरावलोकन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र येत्या २६ जानेवारी २०२५ च्या दिवशी प्रदान करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे, डॉ. फिरोज शेख आणि इतर शिक्षकवर्ग यांनी विशेष प्रयत्न केले. स्थानिक पातळीवर या स्पर्धेचे मोठ्या प्रमाणावर कौतुक झाले असून, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाबद्दलची गोडी निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला आहे.

# झेप फाऊंडेशनतर्फे हळदीकुंकू समारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलांना स्वयंरोजगार देऊन महिलांचे सबलीकरण आणि सक्षमीकरण करणाऱ्या झेप फाऊंडेशनने अनेक उपक्रमांच्या माध्यमातून सातासमुद्रापार भरारी घेतली आहे. त्या उपकक्रमांपैकी हळदी कुंकू हा एक उपक्रम महिलांच्या आठवणीत राहणार ठरला आहे.

मकर संक्रांतीचे औचित्य साधून झेप फाऊंडेशनने सौभाग्याचं लेणं असणारा हळदीकुंकू सोहळा आयोजित केला होता. रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अर्थ बांधकाम सभापती आणि झेप फाऊंडेशनच्या संस्थापिका चित्रा आस्वाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हळदी कुंकू सोहळ्यामध्ये हजारो सुवासिनींनी आपला सहभाग नोंदविला.



केवळ धार्मिक रूढी जपायची म्हणून हे हळदी-कुंकू नाही तर त्या निमित्ताने आपल्यातील व्यवस्थापनकौशल्य, कलाकुसर दिसते. तसेच वैचारिक, बौद्धिक देवाणघेवाण होते म्हणून हा सण साजरा करते. या निमित्ताने महिला एकमेकींना भेटतात. उखाण्यातून स्त्रियांची कल्पकता, कविवृत्ती जागृत होते व हा आनंद एकमेकींबरोबर वाटला जातो. हळदी-कुंकवाचा वारसा आपण पुढे नेला नाही, तर कोण नेणार? समाजाचं आपण देणं लागतो. मग त्यातील संस्कृतीही आपण जपायलाच हवी आणि हळदी-कुंकू हे त्याचेच निमित्त आहे, असे झेप फाउंडेशनच्या संस्थापिका चित्रा पाटील यांनी सांगितले.

'चूल आणि मूल' यातून स्त्रियांनी बाजूला होऊन एकत्र यावे. आपल्या मनातील विचार मांडून प्रत्येक पाऊल प्रगतीचं कसं ठरतंय याचा विचार एकत्र आल्यामुळे होऊ शकतो. या एकत्र येण्याने काही काळ तरी महिला रोजचा ताणतणाव विसरून उत्साहात बाहेर पडतात. नव्या ओळखी होतात. पूर्वजांनी प्रत्येक सणामागे काहीतरी उद्देश ठेवला. यातून भेटीगाठी होतात, प्रेमाची व विचारांची देवाणघेवाण, चालीरीतींना उजाळा मिळतो, असेही चित्रा पाटील यांनी सांगितले.

# लक्ष्मण अभंगे यांचे साहित्यिक स्मारक उभे राहावे -रामदास आठवले

**कर्जत : प्रतिनिधी**

साहित्यिक लक्ष्मण अभंगे यांचे जाण्यानंतर त्यांचे साहित्य जोपासण्याची गरज आहे. त्यामुळे लक्ष्मण अभंगे यांचे स्मारक भडवळ गावात उभे राहायला यावे. यासाठी आमच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे. या स्मारकाच्या उभारणीसाठी सामाजिक न्याय विभागाकडून जो लागेल तो निधी दिला जाईल परंतु लक्ष्मण अभंगे साहित्य टिकले पाहिजे. यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, अशी सूचना सामाजिक न्याय केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

साहित्यिक लक्ष्मण अभंगे यांचे निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबियांच्या सांत्वना करिता कर्जत तालुक्यातील भडवळ येथे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आले होते. रिपब्लिकन सेक्युलर चे राष्ट्रीय अध्यक्ष शाम गायकवाड, कर्जत चे माजी आमदार सुरेश लाड, कर्जत पंचायत समिती माजी उप सभापती मनोहर थोरवे, जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, कोकण संघटक मारुती गायकवाड, कोकण प्रदेश युवक अध्यक्ष सुशांत सपकाळ, युवक रायगड जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, आरपीआय महाराष्ट्र कार्यकारी सदस्य सुमित मोरे, महाराष्ट्र युवक कार्यकारणी सदस्य ड उत्तम गायकवाड, कर्जत तालुका युवक अध्यक्ष अमर जाधव, कर्जत महिला शहर अध्यक्ष वैशाली भोसले, कर्जत भात संशोधन केंद्राचे डॉ रवींद्र मर्दाने, जेष्ठ कार्यकर्ते देवराम धनवटे, आरपीआय कर्जत शहर अध्यक्ष अरविंद मोरे, नेरळ शहराध्यक्ष दिनेश आढाव आदी उपस्थित होते.

# २० जानेवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी सप्तसुत्री कार्यक्रम राबविण्याच्या सूचना दिल्या असुन या कार्यक्रमान्वये नागरिकांच्या तक्रारीचे निवारण हा मुख्य विषय असून त्यामध्ये लोकशाही दिन अधिक प्रभावीपणे राबविण्यावर विशेष भर दिला आहे.

शासन परिपत्रक २६ सप्टेंबर २०१२ अन्वये तालुका, जिल्हा/महानगरपालिका, विभागीय, मंत्रालय स्तरांवरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. त्यानुषंगाने

मुरूड तहसील कार्यालयात २० जानेवारी रोजी सकाळी १० वा. लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. सदर लोकशाही दिनामध्ये नागरिकांनी त्यांच्या तक्रारीचे अनुषंगाने अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार रोहन शिंदे यांनी केले आहे.

# भटवाडी रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील रिस भटवाडी येथील महाबळी शेट्टी ते प्रमोद राईलकर यांच्या परिसरातील रस्त्याच्या डांबरीकरण कामाला अखेर मुहुर्त मिळाला असून या दुरावस्था झालेल्या रस्त्याचे भुमीपुजन मंगळवारी (दि.१४) सरपंच उमाताई संदिप मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे यांच्या हस्ते झाले.

या रस्त्याची दुरावस्था झाल्याने नागरिकांना विशेषत:



शालेय विद्यार्थ्यांना या रस्त्यावरुन ये-जा करताना विविध समस्यांना सामोरे जावे लागायचे, ही समस्या प्रमोद राईलकर यांनी माजी सरपंच संदिप मुंढे यांना सांगताच त्यांनी पाठपुरावा करून जिल्हा नियोजन निधी उपलब्ध करुन दिला. अखेर माजी सरपंच संदिप मुंढे यांच्या प्रयत्नांना यश आल्याने भटवाडी येथील महाबळी शेट्टी ते प्रमोद राईलकर या रस्त्याचे भुमीपुजन सरपंच उमाताई मुंढे, उपसरपंच भुषण पारंगे यांच्याहस्ते पार पडले.

या वेळी माजी सरपंच संदिप मुंढे, ग्रामपंचायत सदस्या ताई पवार, प्रमोद राईलकर, पाडूरंग पारंगे, मुकुंद जांभळे, दिलिप पारंगे, नामदेव कोकंबे,अजय म्हस्कर, कैलास म्हात्रे, सागर सुखदरे, संतोष मैदगीकर, अरुण मानकामे, संजय दराडे, बाबासाहेब सोनावणे, दिपक कुशेकर, शंकर मुगडे, विजय चौधरी, प्रशांत खाने, रमेश शेट्टी आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - धानसर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट/सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १३ | - | ०-२०-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-२०-०० | ३.०५ | श्री. शुभम संतोष म्हात्रे. |

पनवेल.
दिनांक : १६/०१/२०२५.

**सही /-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**

शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# विजय हजारे ट्रॉफीसाठी उद्या फायनल

## कर्नाटकच्या संघाची अंतिम सामन्यामध्ये एन्ट्री

**बडोदा : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील पहिल्या सेमी फायनल लढतीत कर्नाटकच्या संघाने हरयाणाचा खेळ खल्लास करत फायनलमध्ये एन्ट्री केली आहे. स्पर्धेतील अंतिम सामना १८ जानेवारी रोजी बडोद्याच्या मैदानात रंगणार आहे.

बडोदा येथे रंगलेल्या सामन्यात पहिल्यांदा बॅटिंग करताना हरयाणा संघाने निर्धारित ५० षटकात ९ बाद २३७ धावा करत कर्नाटकच्या संघासमोर २३८ धावांचे टार्गेट सेट केले होते. देवदत्त पडिक्कलसह ८६ (११३) आणि स्मरन रविचंद्रन ७६ (९४) यांनी केलेल्या क्लास अर्धशतकी खेळीच्या जोरावर कर्नाटकच्या संघाने पाच विकेट्स आणि १६ चेंडू राखून सामना खिशात घालत फायनल गाठली.



मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील कर्नाटक संघाने पहिल्या सेमी फायनलमधील लढतीत टॉस जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्यांदा फलंदाजी करताना हरयाणा संघ अडखळत खेळताना दिसून आले. कर्णधार अंकित कुमार याने संघाकडून सर्वाधिक ४८ धावा केल्या. त्याच्याशिवाय हिमांशु राणा याने ४४ धावांची खेळी केली. ही जोडी वगळता हरयाणाकडून अन्य कोणत्याही फलंदाजाला दमदार खेळ करता आला नाही. परिणामी संघाचा डाव निर्धारित ५० षटकांत ९ बाद २३७ धाव-ांपर्यंतच पोहचू शकला.

हरयाणा संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना कर्नाटक संघाची सुरुवात खराब झाली. कर्णधार मयंक अग्रवाल खातेही न उघडता तंबूत परतला. त्यानंतर देवदत्त पडिक्कल आणि अनीश या जोडीने संघाचा डाव सावरला. अनीश २२ धावांवर बाद झाल्यावर स्मरन रविचंद्रच्या साथीने देवदत्त पडिक्कल याने १२८ धावांची भागीदारी करत कर्नाटकच्या विजयाचा पाया भक्कम केला. स्मरन रविचंद्रन याने ९४ चेंडूत ७६ धाव-ांची संयमी खेळी केली. दुसरीकडे देवदत्त पडिक्कल याने ११३ चेंडूत ८६ धावा ठोकल्या.

बीसीसीआय अंतर्गत रंगणाऱ्या देशांतर्गत वनडे स्पर्धेत कर्नाटकचा संघ पाचव्यांदा फायनलमध्ये पोहचला आहे. याआधी चार वेळा खेळलेल्या फायनलमध्ये त्यांनी बाजी मारली आहे. याचा अर्थ हा संघ फायनलमध्ये पोहचला की, ट्रॉफीवर नाव कोरल्याशिवाय मागे फिरत नाही, असा खास रेकॉर्ड कर्नाटक संघाच्या नावे आहे. पुन्हा ते जेतेपदाचा डाव साधणार का? ते पाहण्याजोगे असेल.

# पुण्यात राष्ट्रीय क्रीडापटूंचा गौरव

## खाशाबा जाधव यांच्या १००व्या जयंतीचे औचित्य

**पुणे : प्रतिनिधी**

भारताचे पहिले वयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते मल्ल खाशाबा जाधव यांची १०० वी जयंती बुधवारी (दि.१५) पुण्यात राष्ट्रीय क्रीडापटूंचा गौरव करून साजरी करण्यात आली.

वारजे येथिल आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इन्फीनिटी जिम्नॅस्टिक्स हॉलमधील कार्यक्रमात खाशाबांचे पोस्टर व खाशाबांचे चरित्र पुस्तके भेट देऊन नऊ राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. या वेळी आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक अजित जरांडे, लेखक संजय दुधाणे, मानसी करमरकर, प्रवीण भैरवकर, मोहन जरांडे, अभिषेक मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातील खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन अजित जरांडे, संजय दुधाणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. संजय दुधाणे यांनी खाशाबांच्या आठवणींना उजाळा दिला. १९४८ मध्ये खाशाबा जहाजाचा प्रवास करून लंडन ऑलिम्पिकला गेले होते असे सांगून दुधाणे म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि गुरूनिष्ठा असल्याने खाशाबांनी देशासाठी पहिले ऐतिहासिक कांस्यपदक जिंकण्याचा पराक्रम केला. अजीत जरांडे यांनी राज्य क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी करमरकर यांनी केले.

# फुटबॉलपटू रबिया शेखकडे पश्चिम विभागाचे कर्णधारपद



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.३६, कोपरखैरणेगाव येथील माजी विद्यार्थिनी राबिया सागर शेख हिची 'इंडिया खेलो फुटबॉल लीग - २०२५ (IKF-4)' साठी पश्चिम विभागाकडून संघाची कर्णधार म्हणून नुकतीच निवड झाली आहे. ही बाब नवी मुंबई महापालिकेसाठी अत्यंत अभिमानास्पद व गौरवास्पद आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी तिचे अभिनंदन करीत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शिक्षण अधिकारी अरुणा यादव, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव उपस्थित होते.

राबिया शेख हिने यापूर्वीही विविध स्पर्धांमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये -सुब्रतो रॉय फुटबॉल कमध्ये उपविजेतेपद, डीएसओ फुटबॉल स्पर्धा - विजेतेपद, मुंबई फुटबॉल लीग - विजेतेपद, ढऋउ ठाणे फुटबॉल लीग - विजेतेपद - अशा अनेक स्पर्धांचा समावेश आहे.

तिला फुटबॉल प्रशिक्षक रोहन जगताप, ज्ञानेश्वर घुगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. तसेच संघ व्यवस्थापक योगेश सुर्वे, कुणाल कोषटवार,अश्विनी सावले यांचेही वैयक्तिक मार्गदर्शन लाभले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव व शिक्षक प्रशांत गाडेकर यांचेही उत्तम सहकार्य व मार्गदर्शन मिळाले आहे. नमुंमपा शाळा क्रमांक ३६ कोपरखैरणे गाव येथील विद्यार्थ्यांसाठी राबियाने प्रेरणादायी कामगिरी केली असून तिचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# विनोद कांबळीने जिंकली सर्वांची मने!



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या मुंबईच्या वानखेडे स्टेडियमच्या ५०व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला मुंबईचे सर्व दिग्गज क्रिकेटपटू नुकतेच उपस्थित होते. टीम इंडियाचा माजी फलंदाज विनोद कांबळीही या सोहळ्याला उपस्थित होता. या वेळी त्याला नीट चालताही येत नसताना त्याने आपल्या कृतीने उपस्थित असलेल्या सर्वांची मने जिंकली, ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.

कांबळीने टीम इंडियाचा माजी फलंदाज सुनील गावस्कर यांच्या पायाला स्पर्श केला, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये विनोद कांबळी पहिल्यांदा माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकरला भेटतो. त्यानंतर तो माजी फलंदाज वसीम जाफरला भेटतो. यानंतर तो सुनील गावसकर यांच्याकडे जातो.

प्रथम कांबळीने गावसकर यांच्याशी हस्तांदोलन केले आणि नंतर त्यांच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घेतला. यानंतर कार्यक्रमात कांबळीचा गौरव करण्यात आला.

# ऋषभ पंतही देशांतर्गत सामने खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील भारतीय फलंदाजांची कामगिरी पाहता खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेट खेळावे, असे अनेक दिग्गजांनी सुचवले आहे. भारताला आता चॅम्पियन्स ट्रॉफी खेळायची आहे. या पार्श्वभूमीवर भारताचा विस्फोटक फलंदाज ऋषभ पंत रणजी सामना खेळणार आहे.

यष्टीरक्षक ऋषभ पंत याने दिल्लीकडून पुढील रणजी ट्रॉफी उपलब्ध असल्याची माहिती दिली आहे. हा सामना २३ जानेवारीपासून खेळवला जाणार आहे. दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन (डीडीसीए)च्या अधिकाऱ्यांनी रणजी ट्रॉफी सामन्यांसाठी खेळावे असे सांगितल्यानंतर काही वेळाने पंतने खेळणार असल्याचे निश्चित केले. भारतीय यष्टीरक्षक आणि वरिष्ठ फलंदाज विराट कोहलीचा रणजी ट्रॉफीच्या अंतिम दोन साखळी टप्प्यातील सामन्यांसाठी संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.



डीडीसीएचे सचिव अशोक शर्मा यांनी रणजी सामन्यासाठी ऋषभ पंतच्या उपलब्धतेबद्दल माहिती दिली. पंतने सांगितले आहे की, तो राजकोटमध्ये सौराष्ट्रविरुद्धच्या रणजी ट्रॉफी सामन्याच्या निवडीसाठी उपलब्ध असेल. ऑस्ट्रेलियातील बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये भारतासाठी पाचही कसोटी सामने खेळलेल्या पंतची अलीकडेच इंग्लंडविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या मालिकेसाठी भारताच्या टी-२० संघात निवड करण्यात आली नाही.

सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वाल यानेही मुंबईच्या पुढील सामन्यात भाग घेण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळवले आहे.

### सात वर्षांनंतर पुन्हा रणजी ट्रॉफी खेळणार

ऋषभ पंत २०१७-१८च्या रणजी ट्रॉफीमध्ये अखेरचा सामना खेळला होता. डिसेंबर २०१७मध्ये विदर्भाविरुद्ध अंतिम सामन्यात तो दिल्लीकडून खेळला होता. एलिट ग्रुप डीमध्ये दिल्ली तिसऱ्या स्थानावर असून पाचव्या स्थानावर असलेल्या सौराष्ट्रपेक्षा १४ गुणांनी मागे आहे. २७ वर्षीय पंतने सप्टेंबर २०२४पासून भारतासाठी सर्व १० कसोटी सामन्यांमध्ये भाग घेतला आहे. याशिवाय त्याने हंगामाच्या सुरुवातीला दुलीप ट्रॉफीमध्ये भाग घेतला होता.

## अभिवादन!















**उरण : तालुक्यातील जासई येथील १९८४ सालच्या शौर्यशाली व गौरवशाली लढ्यातील हुतात्म्यांच्या ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्म्यांना आणि प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते दि. बा. पाटील यांना अभिवादन करण्यात आले. त्या वेळची क्षणचित्रे...**

# गव्हाण विद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वार्षिक शालेय क्रीडा महोत्सव विविध क्रीडा स्पर्धांनी (१३ ते १६ जानेवारी) उत्साहात झाला.

पहिल्या दिवशी धावण्याच्या स्पर्धा,वैयक्तिक खेळ भालाफेक,गोळा फेक,थाळी फेक,कॅरम,दोरी उडी इ.संपन्न झाल्या. दुसऱ्या दिवशी इतर सांघिक मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले. लहान व मोठ्या अशा दोन्ही गटात विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या स्वतंत्रपणे कबड्डी, खो-खो अशा स्पर्धांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धा अतिशय उत्साहात संपन्न झाल्या.



भारताला पहिले ऑलिम्पिक पदक प्राप्त करून देणारे विख्यात कुस्तीगीर खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला. या वेळी पै.खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते करण्यात आले

या वेळी क्रीडाशिक्षक सुरेश पारखे यांनी खाशाबा जाधव यांच्या जीवन संघर्षाची कहानी शब्दबद्ध करून विद्यार्थ्यांना मोहित आणि प्रेरित केले. त्यानंतर सलग तिसऱ्या दिवशी पुन्हा विविध प्रकारच्या स्पर्धा होऊन अतिशय उत्साहात क्रीडा महोत्सव महोत्सवाची सांगता झाली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांचेसह शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच विजयशेठ घरत, मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, गुरुकुल प्रमुख संदिप भोईर आणि इतर सर्व क्रीडा शिक्षकांचे अनमोल मार्गदर्शन आणि सहाय्य लाभले.

या वेळी विद्यालयातील सर्व शिक्षक आणि विशेषतः महिला शिक्षिका यांनी पंच, रेफरी वेळाधिकारी, सामनाधिकारी अशा विविध भूमिका चौफेर भूमिका बजावून आपले कौशल्य आणि अष्टपैलुत्व सिद्ध केले.

### बक्षीसांची उद्घोषणा

या वेळी क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी पुढील शैक्षणिक वर्षापासून ज्या विद्यार्थी खेळाडूची राज्य पातळीवर निवड होईल त्याला त्यांच्या वतीने वैयक्तिक दोन हजार रुपये तसेच राष्ट्रीय पातळीवर निवड होणाऱ्या खेळाडूसाठी वैयक्तिक पाच हजार रुपयांची देणगी स्वतःच्या आर्थिक निधीतून देणार असल्याची उद्घोषणा करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. या वेळी संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनीही अशाच भरघोस रकमेच्या बक्षिसांची घोषणा केली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com